- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३६,३५० /-
✔ चांदी : २,४८,३००/-

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, २२ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३१२ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# भंडाऱ्यात महाप्रसादातून विषबाधा, २०० जणांची प्रकृती खालावली

**दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा**

जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील खराशी गावात महाप्रसादातून विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. गावातील एका कार्यक्रमानंतर महाप्रसाद ग्रहण केलेल्या सुमारे १५० ते २०० नागरिकांची प्रकृती अचानक खालावली असून, संपूर्ण गावात भीतीचे वातावरण पसरले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, महाप्रसाद खाल्ल्यानंतर काही वेळातच आणि सकाळच्या सुमारास गावकऱ्यांना उलट्या, मळमळ आणि जुलाबाचा त्रास सुरू झाला. एकाच वेळी अनेक नागरिकांची प्रकृती बिघडल्याने परिस्थिती गंभीर बनली.

त्रास वाढू लागल्याने सकाळपासूनच बाधितांनी उपचारासाठी रुग्णालयांकडे धाव घेतली. सध्या अनेक रुग्णांवर परिसरातील ग्रामीण आणि काही खासगी रुग्णालयांमध्ये तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. एकाच वेळी मोठ्या संख्येने रुग्ण उपचारासाठी येत असल्याने रुग्णालयांमध्ये मोठी गर्दी उसळली आहे.

**आरोग्य विभागाकडून गावातच वैद्यकीय कॅम्प**

घटनेचे गांभीर्य ओळखून प्रशासनाने आणि आरोग्य विभागाने तातडीने पावले उचलली आहेत. गावकऱ्यांच्या सोयीसाठी आणि वेळेवर उपचार मिळण्यासाठी आरोग्य विभागाकडून खराशी गावामध्येच विशेष वैद्यकीय कॅम्प लावण्यात आला आहे. या कॅम्पच्या माध्यमातून वैद्यकीय पथकाकडून रुग्णांची तपासणी आणि त्यांच्यावर उपचार युद्धपातळीवर सुरू आहेत. सध्या सर्व रुग्णांवर वैद्यकीय निगराणीखाली उपचार सुरू आहेत.

**अन्नविषबाधेचे नेमके कारण तपासातून स्पष्ट होणार**

महाप्रसादाचे सेवन केल्यानंतर अनेक नागरिकांची प्रकृती एकाच वेळी खालावल्याने अन्नविषबाधेचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, महाप्रसाद तयार करताना किंवा त्याचे वितरण करताना नेमकी कोणती त्रुटी झाली, अन्न दूषित झाले होते का आणि त्याचा नागरिकांच्या प्रकृतीवर काय परिणाम झाला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेतील बाधितांची अधिकृत संख्या, रुग्णांची प्रकृती आणि विषबाधेचे कारण याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

थोडक्यात

## पंतप्रधान किसान निधी दिवाळीपूर्वी

**दिल्ली :** शेतकऱ्यांसाठी एक महत्वाची बातमी समोर आली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेचा २४ वा हफ्ता कधी मिळणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे. तर लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात २ हजार रुपये जमा होणार आहेत. दिवाळीपूर्वी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा २४ वा हप्ता शेतकऱ्यांना मिळणार असल्याचं बोललं जात आहे. हा हप्ता देशातील ९ कोटी ३० लाख शेतकऱ्यांना मिळणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. रब्बी पिकांची पेरणी, बियाणे आणि खते खरेदी करण्यासाठी ही रक्कम शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे, जर हा हप्ता ऑक्टोबरमध्ये आला, तर मोठा दिलासा मिळेल.

# कराडच्या नव्या उड्डाणपुलावर भीषण अपघात, ४ ठार

**वृत्तसंस्था, कोल्हापूर**

कराडमधील काही दिवसांपूर्वीच उद्घाटन करून वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेल्या सहापदरी उड्डाणपुलावर भीषण अपघात झाला आहे. पुणे-बेंगळुरू महामार्गावरील या पुलावर स्कॉर्पिओ आणि ट्रकची जोरदार धडक झाली. या दुर्घटनेत चार तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर अन्य तिघे जखमी झाले आहेत. दसऱ्यानिमित्त कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे दर्शन घेऊन घरी परतताना या मित्रांवर काळाने घाला घातला. मिळालेल्या माहितीनुसार, सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कातरखटाव येथील सात मित्र रविवारी कोल्हापूरला महालक्ष्मीच्या दर्शनासाठी गेले होते.

दर्शन आटोपून रात्री ते स्कॉर्पिओ गाडीतून गावाकडे निघाले होते. रात्री अकराच्या सुमारास कराड शहराजवळील उड्डाणपुलावर त्यांच्या वाहनाचा भीषण अपघात झाला. या अपघातात स्कॉर्पिओ आणि ट्रकची जोरदार धडक झाली. धडकेची तीव्रता एवढी होती की, स्कॉर्पिओचा पूर्णपणे चक्काचूर झाला. गाडीतील तेजस देशमुख ( वय २५), सागर निंबाळकर (२३), सुयश चिंचकर (२०) आणि रोहित धोत्रे (२१) या चार तरुणांचा मृत्यू झाला.

तर अपघातात ऋतुराज दुबळे (२१), शंतनू शिंगाडे (२०) आणि अमन तांबोळी (२३) हे तिघे जखमी झाले आहेत. अपघातानंतर जखमींना तातडीने नजीकच्या कृष्णा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.नव्या

**उड्डाणपुलावरील अपघाताने सुरक्षेचा प्रश्न**

कराड शहराजवळील हा सहापदरी उड्डाणपूल काही दिवसांपूर्वीच वाहतुकीसाठी खुला करण्यात आला होता. मात्र, पुलावर झालेल्या या भीषण अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. एकाच गावातील चार तरुणांचा मृत्यू झाल्याने कातरखटाव गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## बच्चू कडूंसह सहा जणांवर गुन्हा दाखल

**अमरावती :** शिवसेना नेते आणि आमदार बच्चू कडूंसह सहा जणांवर घुग्घुस पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनापरवानगी आंदोलन व पोलिसांवर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल झाला आहे. स्थानिक भूमिपुत्रांना वेकोलिमध्ये ८० टक्के नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळावे यासह इतर मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी १८ तारीख म्हणजेच रविवारी एक मोर्चा आयोजित केला होता. या मोर्चादरम्यान विनापरवानगी आंदोलन व पोलिसांवर आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्यामुळं त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. विनापरवानगी मोर्चा काढणे, बेकायदेशीर जमाव जमवणे आणि भाषणादरम्यान पोलीस प्रशासन व तहसीलदारांविषयी अत्यंत प्रक्षोभक, अश्लील वक्तव्य करून धमकी दिल्याप्रकरणी माजी राज्यमंत्री तथा आमदार बच्चू कडू यांच्यासह सहा जणांवर घुग्घुस पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




संपादकीय लेखणीतून...

## 'गोकुळ' फलले!

राज्यातील सहकार क्षेत्रातील सर्वात प्रतिष्ठेचा मानला जाणारा गोकुळ दूध संघाचा अवघड गड काँग्रेसचे विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील यांनी सर केला आहे. सत्ताधारी युती आणि विरोधी आघाडीची राजकीय प्रतिष्ठा पणाला लागलेल्या या महासंग्रामात सोमवारी सतेज पाटील यांच्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागांवर विजयाचे सोने लुटले आणि विजयादशमी साजरी केली. मतपत्रिकांद्वारे घेण्यात आलेल्या या अटीतटीच्या लढ्यात सत्ताधारी महायुतीप्रणित सत्ताधारी राजर्षी शाहू विकास आघाडीला मोठा फटका बसला असून त्यांना १२ जागांवरच समाधान मानावे लागले आहे. कोल्हापुरातील प्रतिष्ठेची लढाई मानली जाणारी गोकुळ दूध उत्पादक संघाच्या या निवडणुकीची राज्यभर चर्चा सुरू होती. ही निवडणूक जिंकण्यासाठी काँग्रेस नेते सतेज पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते व मंत्री हसन मुश्रीफ यांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली होती.

सतेज पाटील यांच्या पॅनलने मोठे यश मिळवल्याने विरोधकांचे बळ वाढले आहे तसेच ईव्हीएम हटवून मतपत्रिकांद्वारे निवडणुका घेण्याच्या मागणीला आता बळ मिळेल, अशीही चर्चा आहे. महायुतीप्रणित छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीच्या उमेदवार शौनिका अमल महाडिक यांना काँग्रेसप्रणित सतेज पाटील यांच्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीचे उमेदवार राजू जयवंतराव आवळे यांच्याकडून अवघ्या ७ मतांनी पराभव स्वीकारावा लागला. या निसटत्या पराभवामुळे महाडिक कुटुंबासह भाजप आणि महायुतीला मोठा राजकीय धक्का बसला आहे. गोकुळच्या निवडणुकीत मतदाराने एकनिष्ठ राहावे यासाठी त्यांना देवतांच्या शपथा घालण्यात आल्या होत्या. भंडाऱ्याची राख, देवाच्या शपथा आणि जाडजूड पाकिटांसह सहलीला नेण्याच्या मोहाला न भुलता मतदारांनी स्वाभिमानाचा दणका दिल्याचे दिसते. गोकुळ दूध संघाच्या संचालक मंडळाच्या २५ जागांसाठी ५० उमेदवार निवडणुकीत उतरले होते. कोल्हापूर जिल्ह्यातील ५ हजार ४१८ पात्र मतदारांपैकी ५ हजार ४१६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सतेज पाटील यांच्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागांवर विजय मिळवला. महायुतीप्रणित सत्ताधारी राजर्षी शाहू विकास आघाडीला १२ जागांवर समाधान मानावे लागले.

गोकुळचे मावळते अध्यक्ष नविद मुश्रीफ, अरुण डोंगळे, विश्वास पाटील या माजी अध्यक्षांना पराभवाची नामुष्की सहन करावी लागली. ही निवडणूक महायुतीने प्रतिष्ठेची केली होती. मुख्यमंत्र्यांपासून ते जिल्ह्यातील महायुतीच्या नेत्यांनी जोरदार प्रचार केला होता. विरोधात काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी एकहाती प्रचार केला होता. दूध उत्पादक सभासद शेतक-यांनी दिलेला निकाल आम्ही स्वीकारत आहोत. महायुतीमध्ये शेवटपर्यंत सुरू असलेले मतभेद आणि त्यानंतर झालेली युती कदाचित या निकालास कारणीभूत असावी, असे महायुतीचे नेते, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी म्हटले आहे. हा निकाल गोकुळच्या सभासदांच्या एकीचा आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता मतदारांनी समविचारी आघाडीला मतदान करून विजयी केले. त्यांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवू असे समविचारी आघाडीचे नेते सतेज पाटील म्हणाले.

निकाल घोषित होताच सतेज पाटील यांच्या अजिंक्यतारा या जनसंपर्क कार्यालयावर जणू दसऱ्यापूर्वीच दिवाळी साजरी झाली. दूध उत्पादक आणि कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात सतेज पाटलांना खांद्यावर घेतले. गुलालाची उधळण आणि फटाक्यांची आतषबाजी केली. गत अनेक वर्षापासून गोकुळ दूध संघावर असलेले महाडिक घराण्याचे वर्चस्व या निवडणुकीत मोडीत काढत सतेज पाटील यांनी समविचारी आघाडीची सत्ता स्थापन करून महायुतीला मोठा धक्का दिला. या निवडणुकीत पारंपरिक राजकीय घराण्यातील अनेक दिग्गज नेते मैदानात असले तरी मतदारांनी महायुतीच्या दोन प्रमुख नेत्यांना चांगलाच दणका दिला. महायुतीचे मंत्री हसन मुश्रीफ यांचे चिरंजीव मावळते अध्यक्ष नविद मुश्रिफ यांना ओबीसी गटातून समविचारीचे शशिकांत खोत यांनी ६९ मतांनी पराभूत केले. त्यांच्यासह गोकुळचे अरुण डोंगळे, विश्वास पाटील या माजी अध्यक्षांनाही पराभवाची चव चाखावी लागली.

# हार्वर्डमधील विद्वानांची परखड भूमिका

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

कोणत्याही देशाच्या लोकशाहीचे यश हे केवळ निवडणुकांपुरते मर्यादित नसते, तर त्या देशातील घटनात्मक संस्थांच्या स्वायत्ततेवर आणि विश्वासार्हतेवर ते अवलंबून असते. भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशात, संविधानाने निर्माण केलेल्या संस्था या राज्यव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ आहेत. परंतु, अलीकडच्या काळात या संस्थांवर जाणीवपूर्वक आणि सतत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असल्याच्या प्रवृत्तीने अनेक अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतले आहे. याच पार्श्वभूमीवर जागतिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या आणि विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या भारतीय विद्वानांनी भारताच्या लोकशाही संस्थांच्या संरक्षणासाठी आवाज उठवला आहे.

हार्वर्ड विद्यापीठाशी संबंधित ४४ भारतीय विद्वान, माजी विद्यार्थी आणि व्यावसायिकांनी एक संयुक्त निवेदन जारी करून भारतातील सर्वोच्च न्यायालय आणि निवडणूक आयोग यांसारख्या घटनात्मक संस्थांवर होणाऱ्या पद्धतशीर हल्ल्यांविषयी अत्यंत परखड भूमिका मांडली आहे.

अमेरिकेतील प्रतिष्ठित हार्वर्ड विद्यापीठाशी संबंधित असलेल्या तब्बल ४४ भारतीय विद्यार्थी, माजी विद्यार्थी, धोरण तज्ज्ञ आणि व्यावसायिकांनी भारतीय संस्थांच्या बाजूने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. या विद्वानांनी १४ ऑक्टोबर २०२६ रोजी एक सविस्तर संयुक्त निवेदन प्रसिद्ध करून आपली गंभीर चिंता व्यक्त केली. 'संविधानिक जबाबदारी, कायद्याचे राज्य आणि संस्थात्मक सचोटी' या शीर्षकाखाली हे पत्रक जारी करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने भारताचा निवडणूक आयोग, सर्वोच्च न्यायालय, सरन्यायाधीशांचे कार्यालय आणि संसद यांसारख्या सर्वोच्च घटनात्मक संस्थांवर ज्या प्रकारे आणि ज्या भाषेत आरोप केले जात आहेत, त्याला तीव्र विरोध दर्शवण्यात आला आहे.

या निवेदनाची पार्श्वभूमी भारतीय राजकारणातील काही ताज्या घडामोडींशी जोडलेली आहे. देशात मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणावरून आणि भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून काही राजकीय गटांकडून आंदोलने करण्यात आली होती. अशा राजकीय वातावरणात, देशाच्या सर्वोच्च संस्थांबद्दल जाणीवपूर्वक नकारात्मक प्रचार केला जात असल्याचा दावा या पत्रकाद्वारे करण्यात आला. विद्वानांच्या मते, लोकशाही व्यवस्थेत सरकार किंवा कोणत्याही प्रशासकीय संस्थेवर टीका करण्याचा, तसेच त्यांच्या धोरणांशी असहमती दर्शवण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. परंतु, असे करताना आरोपांना भक्कम पुराव्यांचा आणि कायदेशीर प्रक्रियेचा आधार असणे अत्यंत आवश्यक असते. पुराव्यांशिवाय आणि केवळ राजकीय स्वाथार्साठी अशा संस्थांची विश्वासार्हता धुळीस मिळवणे हे संपूर्ण लोकशाहीसाठी अत्यंत घातक ठरू शकते.

या पत्रकातून आणखी एका अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यावर भर देण्यात आला आहे, तो म्हणजे घटनात्मक संस्थांवर टीका करताना वापरली जाणारी भाषा. निवडणूक आयोग किंवा सर्वोच्च न्यायालय यांसारख्या आदरणीय संस्थांबद्दल शंका निर्माण करताना भारताला जणू काही घेरले गेले आहे, असे भासवण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच, घटनात्मक पदांवर बसलेल्या अधिकाऱ्यांना 'चोर' किंवा 'तडजोड केलेले' अशा अपमानास्पद शब्दांत हिणवणे हे लोकशाहीच्या मूल्यांना हरताळ फासणारे आहे, असे मत या ४४ जणांनी अत्यंत परखडपणे मांडले आहे. यासोबतच, आपल्या राजकीय मोहिमांना किंवा छुप्या उद्देशांना विश्वासार्हता मिळवून देण्यासाठी काही गटांकडून हार्वर्ड विद्यापीठ या संस्थेच्या नावाचा योग्य परवानगीशिवाय गैरवापर केला जात असल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

या निवेदनावर स्वाक्षरी करणाऱ्यांमध्ये हार्वर्ड केनेडी स्कूल, हार्वर्ड मेडिकल स्कूल, हार्वर्ड लॉ स्कूल आणि हार्वर्ड एक्स्टेंशन स्कूल यांसारख्या विविध शाखांमधील वकील, संशोधक, शास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ यांचा समावेश आहे. रजत सेठी, ए. के. राघवन, अभिज्ञान सत्यम, अर्जुनवीर शर्मा, दिव्या द्विवेदी, डॉ. यश अगळगावकर, आदित्य श्रीनिवासन आणि अल्मास लोखंडवाला यांसारख्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या पत्राद्वारे आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी हेही आवर्जून नमूद केले आहे की, हे विचार केवळ स्वाक्षरीकर्त्यांचे वैयक्तिक विचार आहेत आणि याला विद्यापीठाची अधिकृत भूमिका मानले जाऊ नये. थोडक्यात सांगायचे तर, असहमती आणि विरोध हा लोकशाहीचा आत्मा असला तरी, तो पुराव्यांवर आधारित असावा आणि तो मांडताना घटनात्मक संस्थांचा अवमान होऊ नये, हाच या संपूर्ण घडामोडीचा आणि विद्वानांच्या चिंतेचा मुख्य गाभा आहे.

"आपली निष्ठा ही सोयीनुसार बदलणारी नसून संविधानाला असायला हवी; आपला लढा निवडक संतापासाठी नसून न्यायासाठी असावा आणि राजकीय आरोपांऐवजी लोकशाही संस्था बळकट करण्यासाठी आपण एकत्र आले पाहिजे."

– हार्वर्ड संलग्न विद्वानांच्या पत्रातील प्रमुख संदेश

– ९५६१५०४३०६

# भारतीय महिलांनी केला झिंबाब्वेचा सुपडासाफ!

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

भारत दौऱ्यावर आलेल्या झिंबाब्वे महिला संघाला तीन टिट्वेंटी सामन्यांच्या मालिकेत भारतीय महिलांनी तीनही सामन्यात लिलया हरवून मालिका खिशात घालताना जागतिक क्रिकेटमध्ये आपल्या वाढत्या वर्चस्वाला पुन्हा एकदा सिद्ध केले. पूर्णवेळ कर्णधार म्हणून स्मृती मंधानाची हि पहिलीच मालिका तिच्यासाठी शानदार अनुभव ठरली.

**हरमनप्रितची स्फोटक खेळी**

भारतीय महिला क्रिकेट संघाने तिसऱ्या टी२० सामन्यात झिम्बाब्वेला ९२ धावांनी हरवून तीन सामन्यांची मालिका ३-० ने जिंकली. रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ७ गडी गमावून २१६ धावा केल्या. प्रत्युत्तरात, झिम्बाब्वे २० षटकांत ७ गडी गमावून केवळ १२४ धावाच करू शकला. भारतासाठी शेफाली वर्मा आणि हरमनप्रीत कौर यांनी अर्धशतके झळकावली. शेफालीने ३७ चेंडूंमध्ये ६९ धावा केल्या. हरमनप्रीत ४१ चेंडूंमध्ये ९१ धावांवर नाबाद राहिली. गोलंदाजीत, नंदिनी शर्माने १८ धावांत ३ बळी घेतले. मंगळवारी, भारताने मायदेशात आपला सर्वात मोठा टी२० विजय नोंदवला. यापूर्वीचा विजय २०१६ मध्ये बांगलादेशविरुद्ध ७२ धावांनी मिळवला होता.

हरमनप्रीतने २००+ स्ट्राइक रेटने फलंदाजी केली. एके काळी हरमनप्रीत १२ चेंडूंमध्ये ११ धावांवर संघर्ष करत होती. त्यानंतर, तिने मोठे फटके मारायला सुरुवात केली आणि ४१ चेंडूंमध्ये नाबाद ९१ धावा केल्या. तिच्या खेळीत १० चौकार आणि ५ षटकारांचा समावेश होता. तिचा स्ट्राइक रेट २२१.९५ होता. हरमनप्रीतने शेफालीसोबत ४१ चेंडूंमध्ये तिसऱ्या विकेटसाठी ८४ धावा जोडल्या. भारताने शेवटच्या पाच षटकांत ६२ धावा केल्या, मात्र या काळात संघाने चार विकेटही गमावल्या. डावानंतर मुलाखतीदरम्यान हरमनप्रीत भावूक झाली आणि तिच्या डोळ्यात अश्रू आले. कर्णधारपदावरून पायउतार झाल्यानंतरची ही तिची पहिलीच मालिका होती. ६ ऑक्टोबर रोजी तिने भारतीय संघाच्या तिन्ही फॉरमॅटमधील कर्णधारपदाचा राजीनामा जाहीर केला होता. यानंतर स्मृती मंधानाची नवीन कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली. माजी कर्णधार हरमनप्रीत मुलाखतीदरम्यान भावनावश झाली. शेफलीने ६९ धावा केल्या, अनुष्कासोबत ५४ धावांची भागीदारी केली.

भारताच्या डावाची सुरुवात शेफाली वर्मा आणि अनुष्का शर्मा यांनी केली. या दोघींनी पहिल्या विकेटसाठी ५४ धावा जोडल्या. अनुष्काने २० चेंडूंमध्ये चार चौकार आणि एका षटकारासह २८ धावा केल्या. ती ५.२ षटकांत बाद झाली. शेफालीने आपली आक्रमक फलंदाजी सुरूच ठेवली. तिने ३७ चेंडूंमध्ये सहा चौकार आणि पाच षटकारांसह ६९ धावा केल्या. तिचा स्ट्राईक रेट १८६.४९ होता. झिम्बाब्वेसाठी मायर्स आणि बेजा यांना संघर्ष करावा लागला.

२१७ धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात खराब झाली. केलीस न्धलोवू पहिल्याच चेंडूवर बाद झाली. त्यानंतर शार्न मायर्स आणि सर्वांची लाडकी बेजा यांनी डाव सावरला. त्यांनी तिस?या विकेटसाठी ८२ धावांची भागीदारी केली. मायर्सने ४९ चेंडूंमध्ये ६० धावा केल्या, तर बेजाने ५० चेंडूंमध्ये ४४ धावा केल्या. मायर्सच्या खेळीत चार चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता. ती १४.३ षटकांत ९४ धावांवर बाद झाली. यानंतर झिम्बाब्वेचा धावगतीचा वेग मंदावला आणि ठराविक अंतराने विकेट पडू लागल्या. १९ व्या षटकात बेजादेखील बाद झाली. तिने पाच चौकार मारले होते, पण एकही षटकार मारला नव्हता. झिम्बाब्वे २० षटकांत केवळ १२४ धावाच करू शकले. भारतासाठी नंदिनी शर्माने तीन बळी घेतले. दीप्ती शर्मा, निकी प्रसाद, क्रांती गौड आणि अरुंधती रेड्डी यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. नंदिनीने शेवटच्या षटकात बेजा आणि लॉरीन फिरी यांना बाद करून झिम्बाब्वेचा डाव १२४/७ वर संपवला.

नंदिनी शर्माने ४ षटकांत १८ धावा देऊन ३ बळी घेतले.

भारताने या सामन्यात ११ षटकार मारले. महिलांच्या टी२० आंतरराष्ट्रीय डावात एका संघाने मारलेल्या षटकारांची ही संयुक्त तिसरी सर्वोच्च संख्या आहे. यापूर्वी भारताने २०२६ मध्ये श्रीलंकेविरुद्ध १३ आणि बांगलादेशविरुद्ध १२ षटकार मारले होते. यावर्षी भारतीय महिला संघाने टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एकूण १२८ षटकार मारले आहेत. एका कॅलेंडर वर्षात एका संघाने मारलेल्या सर्वाधिक षटकारांचा हा विक्रम आहे. २०२६ मध्ये ७७ षटकारांसह दक्षिण आफ्रिका दुसऱ्या स्थानावर आहे. शेफाली वर्मानेही एक वैयक्तिक विक्रम प्रस्थापित केला आहे. तिने २०२६ मध्ये महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ४७ षटकार मारले, जे एका कॅलेंडर वर्षात कोणत्याही खेळाडूने मारलेले सर्वाधिक षटकार आहेत. या यादीत श्रीलंकेची चमारी अटापट्टू २०२४ मध्ये ३२ षटकारांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

**भारताचा सलग ११वा टी-२० आंतरराष्ट्रीय विजय**

भारताची टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील विजयाची मालिका ११ सामन्यांपर्यंत वाढली आहे. या फॉरमॅटमध्ये झिम्बाब्वेचा हा सलग २३वा पराभव होता. मंधानाच्या कर्णधारपदाखाली भारताचा सलग दुसरा विजयः झिम्बाब्वेवर ९ गडी राखून विजय; शेफालीने अर्धशतक झळकावले, स्मृतीने नाबाद ४७ धावा केल्या

**दोन दिवसांपूर्वीच्या दुसऱ्या सामन्यातही एकतर्फी विजय**

शेफालीने ६ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने २५ चेंडूंमध्ये ५५ धावा केल्या. भारतीय महिला संघाने दुसऱ्या टी२० सामन्यात झिम्बाब्वेवर ९ गडी राखून विजय मिळवला. रायपूरमध्ये प्रथम फलंदाजी करताना, झिम्बाब्वेने २० षटकांत ८ गडी दिवसांपूवीर्ची १०२ धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारताने ८.५ षटकांत १ गडी गमावून हे लक्ष्य पूर्ण केले. या विजयासह, टीम इंडियाने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली. सलामीवीर शफाली वर्माने २५ चेंडूंमध्ये ५५ धावा केल्या, तर कर्णधार स्मृती मंधाना २३ चेंडूंमध्ये ४७ धावांवर नाबाद राहिली. कर्णधार स्मृती मंधानाने षटकार मारून संघाला विजय मिळवून दिला.

**शेफाली आणि मंधानाने पॉवरप्लेमध्ये ७६ धावा केल्या**

१०३ धावांचे लक्ष्य गाठताना, शेफाली वर्मा आणि स्मृती मंधानाने आक्रमक सुरुवात केली. त्यांनी पहिल्या सहा षटकांत एकही गडी न गमावता ७६ धावा केल्या. शेफालीने २४ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यांनी पहिल्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी केली. शेफाली ५५ धावांवर बाद झाली, पण तोपर्यंत भारत विजयाच्या जवळ पोहोचला होता.

शेफाली आणि स्मृती यांनी ४७ चेंडूंमध्ये पहिल्या विकेटसाठी ९६ धावांची भागीदारी केली. झिम्बाब्वेला केवळ १०२ धावाच करता आल्या. तत्पूर्वी, भारतीय गोलंदाजांनी झिम्बाब्वेला १०२/८ धावांवर रोखले. चिपो मुगेरी-तिरिपानोने ३४ आणि जोसेफिन न्कोमोने २७ धावा केल्या. या दोघींनी तिसऱ्या विकेटसाठी ४५ धावांची भागीदारी केली. मात्र, संघ नियमित अंतराने विकेट गमावत गेला.

भारताकडून निकी प्रसादने दोन विकेट घेतल्या. दीप्ती शर्मा, नंदिनी शर्मा, क्रांती गौड आणि श्री चरानी यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. झिम्बाब्वेच्या डावात तीन फलंदाज धावबादही झाले. भारतीय गोलंदाज नंदिनी शर्मा झिम्बाब्वेच्या केलीस न्धलोवूला बाद केल्यानंतर आनंद साजरा करताना निकी प्रसादने सलग दोन चेंडूंवर दोन बळी घेतले. गोलंदाज म्हणून आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीच्या पहिल्याच चेंडूवर बळी मिळविणारी निकी पहिली महिला भारतीय गोलंदाज ठरली. निकी प्रसादने १४ व्या षटकातील आपल्या पहिल्या दोन चेंडूंवर दोन बळी घेतले. तिने झिम्बाब्वेच्या फलंदाज चिपो मुगेरी-तिरिपानो आणि न्याशा ग्वानजुरा यांना बाद केले. यष्टीरक्षक रिचा घोषने पहिल्याच चेंडूवर मुगेरीचा झेल घेतला. पुढच्याच चेंडूवर ग्वानजुरा धाव न काढता पायचीत बाद झाली. निकीला हॅट्रिक घेण्याची संधी होती मात्र पुढच्या चेंडूवर कर्णधार स्मृतीने डिआरएसचा उपयोग न केल्याने निकीची संधी हुकली.

– ९०९६३७२०८२

# भाविकांसाठी निवास सुरक्षा आणि वैद्यकीय सुविधांचे नियोजन

**कृष्णकुमार निकोडे**
**गडचिरोली**

शिर्डीत श्री साईबाबांचा १०८ वा पुण्यतिथी महोत्सव सोमवार, दिनांक १९ ऑक्टोबर ते बुधवार, दिनांक २१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिभावाने साजरा होत आहे. महोत्सवाचे महत्त्व आणि पार्श्वभूमीः महास्नान व समाधी दिनः साईबाबांनी १५ ऑक्टोबर १९१८ रोजी विजयादशमीच्या (दसऱ्याच्या) दिवशी शिर्डीत महासमाधी घेतली. तिथी व काळः हिंदू कॅलेंडरनुसार आणि परंपरेनुसार हा पुण्यतिथी उत्सव साजरा केला जातो, ज्यामध्ये यंदा १०८ वे वर्ष आहे. प्रमुख कार्यक्रम आणि सोहळेः काकड आरतीः उत्सवाची सुरुवात रोजच्या परंपरेनुसार काकड आरतीने होते. भिक्षा झोळीः साईबाबांनी हयातीत ज्याप्रमाणे भिक्षा मागून उदरनिर्वाह आणि अन्नदान केले, तीच परंपरा पुढे चालवत भिक्षा झोळी कार्यक्रम आयोजित केला जातो. मिळालेले धान्य भोजनालयात वापरून भाविकांना महाप्रसाद दिला जातो. समाधी मंदिर २४ तास उघडेः मुख्य पुण्यतिथीच्या दिवशी- २० ऑक्टोबर रोजी साई समाधी मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी सलग २४ तास खुले राहणार आहे. इतर उपक्रमः समाधीसमोर आराधना विधी, पारंपारिक वाद्यांच्या गजरात पालखी व रथयात्रा, तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आरोग्य व निवास व्यवस्थाः संस्थानतर्फे हजारो भाविकांच्या निवासाची सोय तसेच भाविकांच्या आरोग्यासाठी प्रमुख ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरू करण्यात आले आहेत.

कोट्यवधी साईभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डीनगरीत साईबाबांच्या १०८ व्या पुण्यतिथी महोत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या वतीनं १९ ते २१ ऑक्टोबर २०२६ दरम्यान तीन दिवस हा महोत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यंदाच्या पुण्यतिथी महोत्सवासाठी देश-विदेशातून तीन लाखांहून अधिक साईभक्त शिर्डीत दाखल होतील, असा अंदाज साईबाबा संस्थानने व्यक्त केला आहे. साईबाबांचे समाधी मंदिर २४ तास दर्शनासाठी खुलंः साईबाबांच्या पुण्यतिथी उत्सवासाठी होणारी भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन त्यांना साईदर्शन सुलभतेने घेता यावं, तसेच निवास, भोजनप्रसाद आणि अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी संस्थानकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे, अशी माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली आहे. पुण्यतिथी महोत्सवाचा मुख्य दिवस असलेल्या २० ऑक्टोबर रोजी भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन यंदाही या दिवशी साईबाबांचे समाधी मंदिर २४ तास दर्शनासाठी खुले ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे दूरवरून शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांना गर्दीच्या काळातही साईबाबांचे दर्शन सुलभतेने घेता येणार आहे.

दिनांक १९ ऑक्टोबरपासून पुण्यतिथी महोत्सवाला प्रारंभ : साईबाबांच्या पुण्यतिथी महोत्सवाचा प्रारंभ १९ ऑक्टोबर रोजी सकाळी काकड आरतीनंतर होणार आहे. त्यानंतर साईबाबांच्या पवित्र प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

या शोभायात्रेनंतर द्वारकामाई मंदिरात अखंड श्री साई सच्चरित्र पारायणाला सुरुवात होईल. तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भजन, कीर्तन तसेच स्थानिक आणि निमंत्रित कलाकारांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे शिर्डीनगरी साईनामाच्या गजराने भक्तिमय होणार आहे.

दिनांक २० ऑक्टोबरला भिक्षा झोळीचा कार्यक्रम : पुण्यतिथी उत्सवाच्या मुख्य दिवशी- २० ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता पारंपरिक भिक्षा झोळीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर साईबाबांच्या समाधी मंदिरात आराधना विधी भक्तिभावाने पार पडणार आहे. या विधीनंतर साई प्रसादालयात उपस्थित भाविकांना विशेष भोजनप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. याच दिवशी सायंकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत सुप्रसिद्ध ज्येष्ठ गायक रामशंकर यांच्या विशेष भजनसंध्येचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमातून साईभक्तांना भक्तिगीतांचा आनंद घेता येणार असून संपूर्ण वातावरण साईभक्तीने भारावून जाणार आहे.

दोन लाख भाविकांसाठी महाप्रसादाचे नियोजन : पुण्यतिथी महोत्सवासाठी येणाऱ्या भाविकांच्या भोजन प्रसादाची व्यवस्था हा संस्थानच्या नियोजनातील महत्त्वाचा भाग आहे. मागील वर्षी पुण्यतिथी महोत्सवा दरम्यान सुमारे १ लाख ६० हजार भाविकांनी श्री साई प्रसादालयात महाप्रसादाचा लाभ घेतला होता. यंदा ही संख्या वाढून सुमारे दोन लाखांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज संस्थान प्रशासनाने व्यक्त केला आहे. याशिवाय समाधी मंदिरात दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या भाविकांना मोफत बुंदी प्रसादाचे वाटप करण्यात येणार असून लाडू प्रसादाची पाकिटेही उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांसाठी निवास, सुरक्षा आणि वैद्यकीय सुविधांचे नियोजन : पुण्यतिथी उत्सवासाठी मोठ्या संख्येने भाविक शिर्डीत येणार असल्याने त्यांच्या निवासाची आणि मूलभूत सुविधांची विशेष काळजी घेण्यात येत आहे. संस्थानच्या भक्तनिवासांमध्ये भाविकांसाठी निवासव्यवस्था, पिण्याचे पाणी, सुरक्षा व्यवस्था आणि वैद्यकीय मदत केंद्रांचे नियोजन करण्यात आले आहे. गर्दीच्या काळात भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, तसेच दर्शन आणि भोजनप्रसादाची व्यवस्था सुरळीतपणे पार पडावी, यासाठी संस्थान प्रशासनाकडून आवश्यक ती तयारी करण्यात येत आहे.

– ९४२३७१४८८३

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# दहा गावांना जोडणाऱ्या रस्त्याची दूरवस्था, शासनाला जाग कधी येणार ?

## बससेवा बंद होणार बंद, दहा दिवसांत कार्यवाही न झाल्यास गावकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

भिवापूर तालुक्यातील दहा गावांना जोडणाऱ्या रस्त्याची दुरवस्था नागरिकांच्या जिवावर उठण्याची वेळ आली आहे. खड्ड्यांनी भरलेल्या या रस्त्यामुळे विद्यार्थी, शेतकरी आणि रुग्णांची परवड होत असताना आता बससेवाही बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण करावे, अन्यथा दहा दिवसांनंतर ठिय्या आंदोलन करु असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

नांद, वणी, आलेसूर, धामणगाव, खोलदोडा, बेल्लारपार, भिवी, झामकोली, उरकुडपार आणि महालगाव या दहा गावांतील नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी याच रस्त्याचा आधार घ्यावा लागतो. मात्र, रस्त्याची दुरवस्था आणि अपुऱ्या सुविधांमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात विद्यार्थ्यांचा शाळा-महाविद्यालयापर्यंतचा प्रवास कठीण होतो, शेतमालाच्या वाहतुकीत अडथळे निर्माण होतात आणि रुग्णांना वेळेत रुग्णालयात पोहोचविण्याचा प्रश्न गंभीर बनतो. ग्रामीण जनतेच्या या समस्येकडे शासनाचे लक्ष कधी जाणार, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

**बससेवाही बंद पडण्याची भीती!**

रस्त्याची अवस्था इतकी खराब झाली आहे की, या मार्गावरून धावणाऱ्या बसच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. अपघाताचा धोका लक्षात घेता रस्ता दुरुस्त होईपर्यंत या भागातील बससेवा बंद करण्याचा इशारा एसटी डेपो व्यवस्थापकांनी दिला आहे. बससेवा बंद झाल्यास दहा गावांतील विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर आणि रुग्णांची मोठी गैरसोय होणार आहे. रस्ता दुरुस्त करण्याऐवजी बससेवाच बंद



करण्याची वेळ येत असेल, तर ग्रामीण विकासाच्या दाव्यांचे करायचे काय, असा प्रश्न या निमित्ताने ऐरणीवर आला आहे.

**दहा दिवसांचा अल्टिमेटम**

या रस्त्याच्या प्रश्नावर ग्रामस्थांच्या वतीने २१ ऑक्टोबर रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांना सामूहिक निवेदन देण्यात आले. रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी व तांत्रिक सर्वेक्षण करून नवीन डांबरी रस्ता बांधावा किंवा विद्यमान रस्त्याची दुरुस्ती, मजबुतीकरण व डांबरीकरण करावे, अशी मागणी करण्यात आली. त्यासाठी आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देऊन निधी उपलब्ध करून कामाला प्राधान्याने सुरुवात करावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

येत्या दहा दिवसांत रस्ता वाहतुकीस योग्य झाला नाही किंवा दुरुस्तीच्या कामाला मंजुरी मिळाली नाही, तर विद्यार्थी, पालक, शेतकरी आणि शेतमजुरांना सोबत घेऊन ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पं.स. चे माजी उपसभापती राहुल मसराम यांनी दिला.

**ग्रामस्थांच्या संयमाचा अंत**

रस्त्याच्या प्रश्नामुळे दहा गावांतील नागरिकांना रोजच्या रोज हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. आता निवेदन, मागणी आणि आश्वासनांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष काम सुरू होण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. शासनाने तातडीने दखल घेऊन रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणाला मंजुरी द्यावी आणि बससेवा बंद होण्याची वेळ टाळावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी राहुल मेश्राम, चेतन पडोळे, सचिन वाते, सुरेश हातबुडे, सूरज देशमुख, नितेश तिरगुम आणि किसन उदापुरे उपस्थित होते.

## ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त उमरेडमध्ये कर्तृत्ववान नागरिक, नेत्रदाते कुटुंबे व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

### सुवर्णमहोत्सवी दाम्पत्याचाही सन्मान, आमदार संजय मेश्राम यांची उपस्थिती



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून साने गुरुजी ज्येष्ठ नागरिक मंडळ, उमरेडच्यावतीने कर्तृत्ववान नागरिक, नेत्रदाते कुटुंबीय, बीपीएल प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी आणि सुवर्णमहोत्सवी दाम्पत्याचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या उपक्रमातून सामाजिक योगदान, नेत्रदानाचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष सुरेश झुरमुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन अॅड. चंद्रकांत अखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून आमदार संजय मेश्राम उपस्थित होते. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष मधुकर फुकट, सचिव दादूजी गोखले, माजी अध्यक्ष प्रभाकर लांजेवार आणि ज्येष्ठ सल्लागार नथुजी मेश्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. सुखदेव व ज्योती बडवाईक या सुवर्णमहोत्सवी दाम्पत्याचा विशेष सन्मान करण्यात आला. बीपीएल प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी रिषभ दोनाडकर, सोहन चौधरी, एंजल भांडे, आरोही खांबाडकर, अथर्व देवीकर, रुद्रेश मौदेकर, वैष्णवी धकाते, तृप्ती देशमुख, मयंक मौदेकर, गोपिका मस्की, निकेश येनगंटीवार, शर्वरी मेंढे, अनिकेत भोगे आणि आरोशी ढोणे यांचा गौरव करण्यात आला.

नेत्रदानाच्या माध्यमातून समाजापुढे आदर्श निर्माण करणाऱ्या बाबाराव तोटवार, सत्यभामा झाडे, मधुरजी कणेर्वार, भागवतताई, राजेशजी अग्रवाल, नरेंद्र गडबोरीकर, किशोर साधवानी, प्रभू लव्हे आणि रूपराव कामडी यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. तसेच कर्तृत्ववान नागरिक म्हणून नथुजी मेश्राम, शिवचरण सांडेकर, नारायणरावसाहेब गायकवाड, संजय बंसल आणि मोहन कडू यांचा गौरव करण्यात आला. आमदार संजय मेश्राम यांनी मंडळाच्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत भविष्यात सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दादूजी गोखले यांनी केले. गंगाधर काटवले आणि प्रकाश जुमडे यांनी सूत्रसंचालन केले, तर राम तांबडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शरद व्यवहारे, अलका रेवतकर, मनोहर तोंडे, दुधराम गायधने, स्मिता देशमुख, कृष्णा हेडाऊ, केशव डेंगे, राजू नाईक, प्रकाश वाघमारे यांच्यासह मंडळाच्या सदस्यांनी सहकार्य केले.

## आमदार संजय पुराम यांचे लहान मुला-मुलींप्रती प्रेम; मायेचा अनमोल झरा!

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा :** लहान मुला-मुलींच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य, त्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने आणि मनातील आनंद यांना विशेष महत्त्व देणारे आमदार संजय पुराम यांचे बालकांप्रती असलेले प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा सर्वांचे लक्ष



वेधून घेत आहे. लहान मुलांशी प्रेमाने संवाद साधणे, त्यांच्यात सहज मिसळून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे, ही आमदार संजय पुराम यांच्या संवेदनशील स्वभावाची सुंदर ओळख आहे. बालकांप्रती असलेला त्यांचा जिव्हाळा हा माणुसकी आणि सेवाभावाचे दर्शन घडविणारा आहे. मुले ही देशाचे उज्ज्वल भविष्य असून, त्यांच्या सर्वांगीण विकासातूनच सशक्त समाजाची निर्मिती होऊ शकते. बालकांना दर्जेदार शिक्षण, सुरक्षित वातावरण आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे ही समाजातील प्रत्येकाची जबाबदारी आहे. मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि त्यांच्या मनातील आनंद जपणे, हेच खऱ्या समाजसेवेचे प्रतीक आहे.

'पदापेक्षा माणुसकी मोठी, राजकारणापेक्षा प्रेम मोठे आणि शब्दांपेक्षा कृती श्रेष्ठ,' हा संदेश बालकांप्रती असलेल्या आपुलकीतून अधोरेखित होतो. लहान मुला-मुलींना प्रेम, प्रोत्साहन आणि आधार मिळाल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. आमदार संजय पुराम यांचे बालकांप्रती असलेले प्रेम आणि जिव्हाळा समाजात सकारात्मक संदेश देणारा असून, बालकांच्या आनंदी व उज्ज्वल भविष्यासाठी अशा संवेदनशील दृष्टिकोनाची गरज आहे.

## आमगाव तालुक्यातील ९ जिल्हा परिषद शाळांमधील कन्यापूजन कार्यक्रमाला विरोध

### शाळेच्या वेळेत धार्मिक कार्यक्रम आयोजित केल्याचा आरोप, पत्रकार इसुलाल भालेकर यांची गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव तालुक्यातील नऊ जिल्हा परिषद शाळांमध्ये शाळेच्या अधिकृत वेळेत कन्यापूजन कार्यक्रम आयोजित करण्यात येत असल्याच्या मुद्द्यावरून पत्रकार इसुलाल भालेकर यांनी आक्षेप घेतला आहे. या कार्यक्रमाला स्थगिती देऊन तो रद्द करण्याची मागणी त्यांनी पंचायत समिती आमगावच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार अर्जाद्वारे केली आहे.

तक्रारीनुसार, विश्वमांगल्य सभा, गोंदिया जिल्हा या संस्थेच्या वतीने १४ ऑक्टोबर २०२६ रोजी आमगाव तालुक्यातील नऊ जिल्हा परिषद शाळांमध्ये सकाळी १०.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत कन्यापूजन



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. हा कालावधी शाळेच्या नियमित वेळेत येत असल्याने भालेकर यांनी या कार्यक्रमाबाबत आक्षेप नोंदविला आहे.

**या नऊ गावांतील शाळांचा समावेश**

पानगाव, अंजोरा, बोरकन्हार, बाम्हणी, आमगाव, गोरठा, बोथली, मानेगाव आणि दहेगाव येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे तक्रार अर्जात म्हटले आहे. यासंदर्भात पुरावा म्हणून कार्यक्रम पत्रिकेची छायाप्रतही अजासोबत जोडण्यात आली आहे.

पत्रकार इसुलाल भालेकर यांनी आपल्या तक्रारीत भारतीय संविधानाचे कलम २८ (१), बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र शासनाच्या ४ जानेवारी २०१७ रोजीच्या परिपत्रकाचा उल्लेख केला आहे. शाळेच्या नियमित वेळेत अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत त्यांनी आक्षेप उपस्थित केला आहे.

**कार्यक्रम रद्द करून अहवाल सादर करण्याची मागणी**

संबंधित नऊ शाळांच्या मुख्याध्यापकांना व ग्रामपंचायतींना तातडीने लेखी आदेश देऊन सदर कार्यक्रम रद्द करावा आणि केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा, अशी मागणी भालेकर यांनी केली आहे. या प्रकरणात योग्य कार्यवाही न झाल्यास जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे तसेच आपले सरकार पोर्टलवर तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

सांगण्यात आले आहे की नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणूकीची आचार संहिता शुरू असुन विश्वमांगल्य सभा च्या नावाखाली कन्या पुजन कार्यक्रम राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी घेऊन आहे,

हे सरासर आदर्श आचारसंहिता चे उलंघन आहे! परंतु येथिल संबंधित अधिकारी दुर्लक्ष करित आहेत!

## देवी प्रगटल्याच्या चमत्काराच्या दाव्याचा अ.भा.अंनिसने केला भंडाफोड

### लोकांनी पसरवली अफवा, कुटूंबाची लेखी कबुली

**दै. सिंहवाणी वृत्त, देवळी**

येथील एका घरातील भिंतीवर देवी चित्ररुपाने प्रगट होत दर्शन दिल्याच्या चमत्काराच्या दाव्याचा अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती वर्धा जिल्हा व देवळी तालुका शाखेने भंडाफोड करून, ते मानव निर्मित चित्र भिंतीवर असल्याचे सत्य समोर आनले आहे. "चमत्कार झाल्याचा दावा आमचा नाही तर नागरिकांनी ती अफवा पसरवली." असे कुटुंबाने देवळी पोलिसांना दिलेल्या लेख कबुली जबाबात म्हटले आहे.

सर्वत्र नवरात्रीचे वातावरण असताना दि.१९ ऑक्टोंबर सोमवार रोजी देवळी शहरातील वार्ड क्र.६ मध्ये रहिवासी एका कुटुंबाच्या घरातील भिंतीवर देवीचा चेहरा चित्ररुपाने प्रगट होत दर्शन देत असल्याचा चमत्कार घडल्याची वार्ता समाज माध्यमांवरून सर्वत्र पसरली. हजारो नागरिक या परिसरात गोळा झाले.

देवळी पोलिस स्थानकचे थाणेदार संदीप कापडे यांनी घटनास्थळी पोलिस कर्मचारी पाठवून त्या कुटूंबातील नागरिकांना जादुटोणा विरोधी कायद्या बाबत माहीती देत योग्य त्या सुचना दिल्या. नागरिकांचे लोंढेच्या लोंढे घटना स्थळाकडे येत होते. संबंधित कुटुंबाने घराला बाहेरून कुलूप लावले. या घटनेची माहीती अ.भा.अंनिस वर्धा शाखेला मिळताच, राज्य कार्यकारणी सदस्य संजय इंगळे तिगावकर, जिल्हाध्यक्ष हरिष इथापे यांच्या मार्गदर्शनात अ.भा.अंनिस राज्य शाखा, वर्धा जिल्हा शाखा व देवळी तालुका शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी देवळी पोलिस



स्थानकाला भेट देत थाणेदार संदीप कापडे यांच्याशी संवाद साधला. पोलिस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट देत अ.भा.अंनिस कार्यकर्त्यांनी त्या कुटूंबासह परिसरातील नागरिकांच्या सखोल मुलाखती घेतल्या. काही कार्यकर्ते दि. १९ रोजी मध्यरात्री नंतरही घटनेची माहीती घेत घटनास्थळावर लक्ष ठेऊन होते. या वेळी कुटूंबाने देवळी पोलिसांना लेखी स्वरूपात खुलासा देत, चमत्कार घडल्याची घटणाच घडली नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यात त्यांनी, "माझ्या घरी भिंतीवर आधीच स्त्रीचे चित्र होते. काही लोकांनी ते देवीचे चित्र आहे, अशी अफवा पसरवली. तसेच लोकांनीच चमत्कार झाल्याचा दावा केला. आम्ही आमच्या घरी भिंतीवर देवी फोटो, चित्र रुपान प्रगट झाल्याचा , चमत्कार झाल्याचा दावा कधीच केला नाही. भिंतीवरील चित्र आम्ही मोडले आहे. जनतेनेच अफवा पसरवली आहे. " असे त्यांनी खुलासेवार लिहून दिले. ज्यातून चमत्काराच्या दाव्याचा भंडाफोड करत अ.भा.अंनिस ने या अफवेला पूर्णविराम दिला.

**परिसरात प्रबोधन सभेत**



घरी भिंतीवर अशाप्रकारे स्त्रीच चित्र होते

**चमत्कार सिद्ध करण्याचे ८०लाख रू. आव्हान**

घटनेच्या परिसरात उपस्थित नागरिकांची छोटेखानी प्रबोधन सभा घेण्यात आली. यात पंकज वंजारे, महाराष्ट्र राज्य युवा संघटक अ. भा. अंनिस यानी सदर घटनेमागील सत्य सांगत, जादुटोणा विरोधी कायद्यातील अनुसूची २ नुसार. 'एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्कारांचा प्रयोग प्रदर्शित करून, त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणे आणि अशा तथाकथित चमत्कारांचा प्रचार व प्रसार करून लोकांना फसवणे, ठकवणे आणि त्यांच्यावर दहशत बसवणे.' गुन्हा आहे. चमत्कार घडत नसतात. चमत्कार सिद्ध करा आणि अ.भा.अंनिसचे ८० लाखाचे बक्षीस मिळवा, असे जाहीर आव्हान यावेळी बोलताना पंकज वंजारे यांनी दिले.

यावेळी अ.भा.अंनिस च्या राज्य महिला शाखा सहसचिव डॉ. सुचिता ठाकरे, वर्धा जिल्हा शाखा सहसचिव अजय इंगोले, जिल्हा उपाध्यक्ष दादाराव मुन, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख आशिष मोडक, देवळी तालुका शाखा अध्यक्ष नरेश ठोकणे, तालुका प्रसिद्धी प्रमुख गणेश शेंडे, राजेश राजुरकर, पत्रकार, पोलीस कर्मचारी व मोठ्या संख्येने स्त्री- पुरूष नागरिक उपस्थित होते.

**थोडक्यात**

## विजयादशमी दसरा धम्मचक्र प्रवर्तन दिन भारतीयांच्या एकतेचे प्रतीक : दिगांबर डोंगरे



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व नगर परिषद काटोल यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुख्य स्मारकाजवळ आज अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. विजयादशमी दसरा धम्मचक्र प्रवर्तन दिन हे ऐकाच दिवशी येणे म्हणजे भारतीयांसाठी ऐक्याचा व समतेचा संदेश देणारा दिवस आहे असत्यावर सत्याने मिळविलेला विजय म्हणजे विजयादशमी प्रेमाने सर्वांशी भेट घेऊन प्रेम आणि आपुलकीची भावना निर्माण करणारा दिवस म्हणजे दसरा आणि करोडो दलीत शोषित पीडित बांधवांना बुद्ध धम्माची दिक्षा देऊन नागपूरच्या दीक्षाभूमीवर ऐतिहासिक धम्मक्रांती करून नव्या धम्म क्रांतीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दीक्षाभूमीवरून केली त्या पवित्र दिनी लाखो आंबेडकरी अनुयायी बुद्धाला व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नतमस्तक होऊन त्या भूमीला नमन करून समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरोधात लढण्यासाठी दीक्षाभूमीवरील माती आपल्या कपाळी लावून ऊर्जा प्राप्त करतात असे मत स्मारक समितीचे अध्यक्ष बहुजन वंचित क्रांति सेनेचे जिल्हा अध्यक्ष तथा काटोल न. प चे माजी सभापती दिगांबर डोंगरे यांनी व्यक्त केले.

यावेळी बांधकाम सभापती गणेश चन्ने, स्मारक समितीचे अध्यक्ष माझी सभापती दिगांबर डोंगरे, नगरसेविका प्रज्ञाताई डोंगरे, उपमुख्याधिकारी उमेश हेमांडे, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष नरेंद्रजी राऊत यांच्या हस्ते माल्यार्पन करून द्वीप प्रज्वलन करून बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी गणेश चन्ने नरेंद्र राऊत उमेश हेमाडे राजु सावरकर यांनी आपले विचार व्यक्त केले. प्रास्ताविक प्रज्ञाताई डोंगरे यांनी संचालन राजु सावरकर यांनी तर आभार मयुर धोंगडी यांनी मानले.

## डोंबिवलीत ३१ ऑक्टोबरला 'गाता रहे मेरा दिल' संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन

### डॉ. राजेंद्र काळे यांच्या सुमधुर स्वरांतून रंगणार मुकेश यांच्या अजरामर गीतांचा सुरेल नजराणा; जनजागृती संस्था मीडिया पार्टनर

**दै. सिंहवाणी वृत्त, डोंबिवली- गुरुनाथ तिरपणकर**

जुन्या हिंदी चित्रपटगीतांचा सुवर्णकाळ पुन्हा अनुभवण्याची संधी संगीतप्रेमींना मिळणार आहे. म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंट प्रस्तुत



'गाता रहे मेरा दिल' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत डोंबिवली पूर्व येथील तिलक नगरमधील सर्वेश हॉल येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक डॉ. राजेंद्र काळे हे ज्येष्ठ पार्श्वगायक मुकेश यांच्या अजरामर गीतांचा सुरेल नजराणा सादर करणार आहेत. जुन्या हिंदी चित्रपटसृष्टीतील भावपूर्ण गीते, मनाला भिडणाऱ्या चाली आणि अविस्मरणीय संगीताचा अनुभव रसिकांना देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मुकेश यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गायकीने अनेक पिढ्यांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. त्यांच्या गीतांमधील भावनिकता, प्रेम, विरह आणि जीवनाचे तत्त्वज्ञान आजही रसिकांना भावते. अशा अजरामर गीतांची मैफल अनुभवण्याची संधी या कार्यक्रमाच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे.या ऑर्केस्ट्रा मध्ये इतरही गायक-गायिका आपली सुमधुर गाणी सादर करणार आहेत.

या कार्यक्रमात डॉ. राजेंद्र काळे हे व्हॉइस ऑफ मुकेश म्हणून मुकेश यांच्या लोकप्रिय गीतांचे सादरीकरण करणार आहेत. त्यांच्या गायनातून जुन्या हिंदी गीतांची गोडी आणि संगीताचा सुवर्णकाळ पुन्हा अनुभवता येणार आहे. अ मेलोडियस म्युझिकल इव्हनिंग अर्थात सुरेल संगीताची संध्याकाळ, अशी या कार्यक्रमाची संकल्पना आहे. म्युझिक मंत्रा एंटरटेनमेंटच्या वतीने शर्मिला केसरकर या कार्यक्रमाच्या आयोजक असून त्या गायिकाही आहेत. कार्यक्रमाच्या सोशल मीडिया व्यवस्थापनाची जबाबदारी तनया केसरकर यांच्याकडे आहे. संगीत संयोजन तुषार बने करणार असून आकाश ऑडिओ साउंड यांच्याकडून ध्वनिव्यवस्था सांभाळली जाणार आहे.

या कार्यक्रमासाठी जनजागृती सेवा संस्था ही मीडिया पार्टनर म्हणून सहभागी झाली आहे. संगीताचा आनंद अधिकाधिक रसिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संस्थेचे सहकार्य लाभणार आहे. संस्थेच्या सहभागामुळे कार्यक्रमाच्या प्रसिद्धीला आणि जनसंपर्काला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शनिवार, ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत डोंबिवली पूर्व, तिलक नगर येथील सर्वेश हॉलच्या दुसऱ्या मजल्यावर हा कार्यक्रम होणार आहे. संगीतप्रेमींनी या सुरेल मैफलीचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक शर्मिला केसरकर यांनी केले आहे.

## वाठोडा उपकेंद्रांतर्गत सकाळी ३ तास वीजपुरवठा खंडित राहणार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

वाठोडा वीज वितरण केंद्राअंतर्गत येणाऱ्या ११ केव्ही महालगाव वीज वाहिनीवर तातडीचे देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेण्यासोबतच नवीन रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) सुरू करणे आणि अपघाती धोका असलेल्या ठिकाणी 'मिडपोल' उभारणिच्या महत्वाच्या कामांमुळे गुरुवारी, २२ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या तीन तासांच्या कालावधीत संबंधित परिसरातील वीजपुरवठा तात्पुरता बंद ठेवण्यात येणार असल्याचे महावितरणकडून कळविण्यात आले आहे. या दुरुस्तीच्या कामामुळे घर संसार सोसायटी, पॅंथर नगर, संघर्ष नगर चौक, देवी नगर, सूरज नगर, न्यू सूरज नगर, पवनशक्ती नगर, भांडे वाडी परिसर, धरती माँ सोसायटी, अंतूजी नगर, अब्बूमिया नगर, तुळशी नगर आणि शैलेश नगर या परिसरांतील वीजपुरवठा खंडित राहील. कामाचे महत्त्व लक्षात घेता वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी, वीज बंद असण्याच्या काळात आपली नियोजित कामे सांभाळावीत आणि महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : गुरूवार, २२ ऑक्टोबर २०२६

# इलेक्ट्रिक वाहतुकीमुळे प्रदूषण कमी होईल, प्रवाशांना दर्जेदार आणि आरामदायी सुविधा मिळतील : नितीन गडकरी

## नागपूर-चंद्रपूर मार्गावर विदर्भातील पहिल्या इलेक्ट्रिक पर्पल बस सेवेचा शुभारंभ

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
प्रसन्ना ट्रॅव्हल्सतर्फे नागपूरझ्रचंद्रपूर मार्गावर सुरू झालेल्या या विदर्भातील पहिल्या आंतरशहरी इलेक्ट्रिक पर्पल बस सेवेमुळे प्रदूषण तर कमी होईल; शिवाय, प्रवाशांना दजेर्दार आणि आरामदायी सुविधा मिळतील, असा विश्वास केंद्रीय मंत्री मा. श्री. नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. प्रसन्ना ट्रॅव्हल्सच्या नागपूर-चंद्रपूर मार्गावरील विदर्भातील पहिल्या इलेक्ट्रिक पर्पल बस सेवेचा शुभारंभ नितीन गडकरी यांच्या हस्ते फित कापून करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.




यावेळी प्रसन्ना ट्रॅव्हल्सचे चेअरमन प्रसन्न पटवर्धन, संचालक सौरभ पटवर्धन व हर्षवर्धन पटवर्धन, रोहित परदेशी, स्विच मोबिलिटीचे सुकांता साहू, अल्पना जैन आणि एम एम एक्टिव्ह नागपूरचे रवी बोरटकर यांची उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, देशात इलेक्ट्रिक कार, ट्रक, बस आणि ट्रॅक्टर यांसारख्या वाहनांची संख्या वाढते आहे. इलेक्ट्रिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारणे आणि बॅटरी स्टोरेजच्या सुविधा विकसित करणे आवश्यक आहे. खासगी बसस्थानकांची उभारणी, आणि प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा देण्यावर भर दिला पाहिजे. इलेक्ट्रिक वाहनांमुळे वाहतुकीचा खर्च कमी झाल्यास त्याचा लाभ प्रवाशांपर्यंत पोहोचला पाहिजे. अन्य बससेवांच्या तुलनेत प्रवासभाडे सुमारे ३० टक्क्यांनी कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे आवाहनही गडकरी यांनी केले.

नागपूर ते ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर या मार्गावर पर्यटनाच्या दृष्टीने मोठी संधी आहे. ताडोबा परिसरात विदेशी पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेता नागपूरझ्रचंद्रपूर इलेक्ट्रिक बससेवा पर्यटनवाढीसाठी उपयुक्त ठरेल. या सेवेमुळे पर्यटकांना आरामदायी प्रवासाची सुविधा मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

प्रसन्ना ट्रॅव्हल्सचे चेअरमन प्रसन्न पटवर्धन म्हणाले, नितीन गडकरी यांच्या प्रोत्साहनामुळे आणि सहकार्यामुळे कंपनीने अनेक टप्पे गाठले आहेत. पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना देण्यासाठी ही सेवा महत्त्वपूर्ण ठरेल.

संचालक सौरभ पटवर्धन यांनी विदर्भात इलेक्ट्रिक आणि इतर शाश्वत वाहने आणण्याचा कंपनीचा मानस व्यक्त केला. नागपूर-चंद्रपूर मार्गावर दर तासाला एक बस धावणार असून, सुरक्षित, आरामदायी आणि पर्यावरणपूरक प्रवासाचा अनुभव प्रवाशांना मिळेल. या सेवेमुळे सुमारे सहा लाख नागरिकांना चांगली वाहतूक सुविधा उपलब्ध होईल. वर्षाला सुमारे आठ लाख लिटर डिझेलची बचत आणि २० लाख किलो कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. कंपनीचा विदर्भातील ५२ मार्गांवर इलेक्ट्रिक बससेवा विस्तारण्याचा तसेच आंतरशहरी वाहतुकीसाठी एक हजार बसेस चालविण्याचा मानस आहे. या उपक्रमामुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीलाही चालना मिळेल, असे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी केले, तर हर्षवर्धन पटवर्धन यांनी आभार मानले.

---

## थोडक्यात

### ढोल-ताशांच्या गजरात नवदुर्गा मंदिराच्या कलशाचे माता बोडीत विसर्जन

**बजरंग चौकातून निघाली भक्तिमय मिरवणूक; दुर्गा समितीचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती**



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**
आमगाव शहरातील बजरंग चौक परिसरातील नवदुर्गा मंदिराच्या कलशाचे तुकडोजी चौक परिसरातील माता बोडी येथे ढोल-ताशांच्या गजरात विसर्जन करण्यात आले. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. देवीच्या जयघोषाने आणि ढोल-ताशांच्या निनादाने परिसर दुमदुमून गेला. नवदुर्गा मंदिरातील धार्मिक कार्यक्रमाची सांगता करताना कलश विसर्जन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. बजरंग चौक येथील नवदुर्गा मंदिरातून निघालेली मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात तुकडोजी चौक परिसरातील माता बोडी येथे पोहोचली. या वेळी भाविकांनी भक्तिभावाने सहभाग घेतला. पारंपरिक वाद्यांचा निनाद, देवीचा जयघोष आणि भाविकांचा उत्साह यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

या विसर्जन सोहळ्याला दुर्गा समितीचे अध्यक्ष राधाकिसन चुटे, उपाध्यक्ष राजेश मानकर, सचिव संजय खोटेले आणि कोषाध्यक्ष मनोहर शिवणकर उपस्थित होते. तसेच समितीचे सदस्य किशोर चुटे, रामचंद्र हुकरे, सुरेश मेश्राम, लीलाधर हत्तीमारे, राजेश मेंढे आणि निकेश शिवणकर यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. भाविकांच्या सहभागात आणि धार्मिक उत्साहात कलश विसर्जनाचा कार्यक्रम पार पडला. या सोहळ्याच्या माध्यमातून परिसरातील धार्मिक परंपरा, श्रद्धा आणि सामूहिक सहभागाचे दर्शन घडले.

### सावनेर येथे धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त सामुहिक बुध्द वंदनेचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**
दरवर्षी प्रमाणे याही वर्षी युवक जागृती मंडळ व सुधाकर बागडे मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने सावनेर बसस्थानका जवळील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णा कृती पुतळा येथे ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिवस फटाक्यांची आतिषबाजी करत साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी भाजप जिल्हा उपाध्यक्ष रामराव मोवाडे होते. सर्व प्रथम मंचकावर उपस्थित मान्यवरांचे निळी टोपी, पंचशील डुपट्टा व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तद्नंतर मान्यवरांचे हस्ते भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुणार्कृती पुतळ्याची पुजा अर्चना व माल्यार्पणनंतर शेकडो समाजबांधवाचा उपस्थित सामुहिक बुध्द वंदना घेण्यात आली. यावेळी 'बाबासाहेब अमर रहे, जबतक सुरज चांद रहेगा बाबा तेरा नाम रहेगा' अशी घोषवाक्य देण्यात आले.

यावेळी भंते शिलरक्षीत महाथेरो, भाजप जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, माजी नगराध्यक्ष अँड अरविंद लोधी शहर काँग्रेसचे कमेटी अध्यक्ष पवन जयस्वाल, संजय काळमेघ, अँड चंद्रकांत सरोदे मराठी पत्रकार संघाचे माजी जिल्हाध्यक्ष प्रा.बाबाराव टेकाडे, विद्या विहार संस्थेचे संस्थापक सचिव प्रा. साहेबराव विरखरे, युवक जागृती मंडळाचे अध्यक्ष सुधाकर बागडे प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक संघटनेचे नेते राज पाटील संचालन कविवर्य सचीन लिडर तर आभारप्रदर्शन मंडळाचे सचिव विक्की शेंडे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी होमेश्वर डोंगरे, चंदु गोंडुळे, परमानंद मानवटकर यांनी मोलाचे सहकार्य केले.

### अनोळखी पुरुष मृतदेहाची ओळख पटविण्याचे सालेकसा पोलिसांचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजू फुंडे**
सालेकसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला असून, मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी



सालेकसा पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस ठाणे सालेकसा येथे मर्ग क्रमांक ४३/२०२६, कलम १९४ भारतीय नागरिक सुरक्षा संहितेनुसार तक्रारदार जगतराम पडोती (वय ४० वर्षे, रा. कोपालगड, ता. सालेकसा, जि. गोंदिया) यांच्या तक्रारीवरून दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी नोंद करण्यात आली आहे. सदर मृतदेह अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयोगटातील पुरुषाचा असून, तो सालेकसा ते चांदसुरजगड मार्गावरील मेनरोडवरील बटाटोला परिसरातील नाल्याच्या पाण्यामध्ये आढळून आला. मृत व्यक्तीचे वर्णन व अंगावरील कपड्यांच्या आधारे ओळख पटविण्याचा प्रयत्न सुरू आहे. मृत व्यक्तीच्या अंगावर काळ्या रंगाची U.S. POLO ASSN. SINCE 1890 XL Premium Cotton अशी अक्षरे असलेली फुल बाह्यांची शर्ट होती. पायात काळ्या रंगाचे ढ्ी कंपनीचे मोजे, उजव्या हातात मनगटाखाली काळ्या व पिवळ्या रंगाचा बाजारू दोरा, तसेच काळ्या रंगाचे प्लास्टिकचे कडे होते. उजव्या हाताच्या बाहेरच्या बाजूस बुद्धिराम, समीक्षा, SUNITA, KAVITA, SUNITA, बबिता, नेहा अशी अक्षरे गोंदविलेली असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. डाव्या हातावर बाहेरच्या बाजूस दिलाचे चिन्ह, त्यात फ किंवा B अशी अक्षरे आणि बाहेर K असे लिहिलेले दिसून येते.

---

## खापरखेडा येथील ग्रीन जिम उद्यानाची दुरवस्था

### आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी लक्ष घालावे, उद्यानाला आले दारूच्या अड्ड्याचे स्वरूप, नागरिकांमध्ये संताप

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
पंचेवीस वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या जॉर्ज कॉलनी परिसरात ग्रीन जिम व निसर्गरम्य उद्यान साकारण्यात आले असून काही महिन्यातच या उद्यानाची दयनीय अवस्था झाली आहे उद्यानाचे लोकार्पण करणारे स्थानिक आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी आश्वासन देऊन कारवाई न झाल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



रोप वे व जॉर्ज कॉलनी येथील सोलर प्रकल्प गुंडाळून खेळासाठी हक्काचे मैदान, निसर्गरम्य उद्यान व ग्रीन जिम उभारण्यात आले. आमदार डॉ.. आशिष देशमुख यांच्या हस्ते उद्यानाचे लोकार्पण करण्यात आले. सुरुवातीला मॉर्निंग वॉक आणि व्यायामासाठी शेकडो नागरिकांची गर्दी होत होती. मात्र खापरखेडा वीज केंद्र प्रशासनाने हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्यामुळे उद्यानाला अक्षरशः अवकळा आली आहे.

उद्यान परिसरात खासगी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले तरीही रात्रीच्या वेळी तळीरामांनी या उद्यानाला चक्क दारूचा अड्डा बनवले आहे. सर्वत्र रिकाम्या बाटल्या, कचरा, अस्ताव्यस्त वाढलेले गवत त्यामूळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. दुर्गंधी आणि समाजकंटकांच्या वाढत्या उपद्रवामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक व चिमुकल्यानी उद्यानाकडे पाठ फिरवली असून सकाळी फिरायला येणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे.

परिसरातील या एकमेव मैदान उद्यानाची दुर्दशा होत असल्यामूळे अनेकांनी वीज केंद्राच्या मुख्य अभियंत्यांपासून ते संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी केल्या. मात्र दखल घेण्यात आली नाही. वीज केंद्र प्रशासनाने हात वर केले. त्यामुळे संतप्त नागरिकांनी आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्याकडे धाव घेतली. मात्र आमदार देशमुखांनी संबंधित अधिकाऱ्यांशी बोलतो, असे उत्तर दिल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. स्थानिक आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी लक्ष घालून उद्यानातील गवत व घाण स्वच्छ करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावे व तळीरामांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची गस्त वाढवावी अशी मागणी करण्यात येत आहे.

---

### वाघाच्या हल्ल्यात एका गायीसह दोन कालवडी ठार, चिखलापार शिवारातील घटना

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
तालुक्यातील चिखलापार येथील नाड शिवारात वाघाच्या हल्ल्यात एका गायीसह दोन कालवडी ठार झाल्याची घटना बुधवारी (दि.२१)



घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शेतात जाण्यासाठीही शेतकरी धास्तावले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, चिखलापार येथील डोमाजी चंपतराव राऊत यांची एक जर्सी गाय व एक कालवड, तसेच रितेश सिताराम सपाट यांची एक कालवड वाघाच्या हल्ल्यात ठार झाली. घटनेची माहिती मिळताच दक्षिण उमरेडचे वनपरिक्षेत्र अधिकारी आंबटकर, चारगावचे राउंड ऑफिसर आणि वनरक्षक यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. चिखलापार, बेसूर, नाड, शिवनफळ, इंदापूर, सालेभट्टी, दांडे, महालगाव आणि पांजरेपार परिसरात वाघांचा वावर असल्याची चर्चा असून, या भागात पाच ते सहा वाघ असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे शेतातील कामांसाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वनविभागाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन वाघांचा बंदोबस्त करावा आणि शेतकऱ्यांना सुरक्षिततेची हमी द्यावी, अशी मागणी तालुका शेतकी सहकारी खरेदी-विक्री समितीचे सभापती भास्कर येंगळे यांनी केली आहे.

---

# आमगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने घाटटेमणी जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत कार्यकर्ता मेळाव्याला उत्कृष्ट प्रतिसाद!

## एसआयआर जनजागृती, पक्ष संघटन बळकटीकरण आणि युवकांसह महिलांच्या सक्रिय सहभागावर भर

**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आमगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करणे, युवकांना पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणणे, महिलांचा सक्रिय सहभाग वाढविणे तसेच मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आमगाव तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न झाली.



देशाचे नेते तथा खासदार प्रफुल्लभाई पटेल आणि खासदार राजेंद्रजी जैन यांच्या मार्गदर्शन व सूचनांनुसार आयोजित या बैठकीला माजी म्हाडा सभापती नरेशभाऊ माहेश्वरी यांचे मार्गदर्शन लाभले. जिल्हा परिषद गोंदियाचे उपाध्यक्ष तथा शिक्षण व आरोग्य सभापती सुरेशजी हर्षे यांच्या अध्यक्षतेखाली काळीमाटी येथील रूपचंदजी गिरीपुंजे यांच्या निवासस्थानी ही बैठक पार पडली.

**एसआयआर प्रक्रियेबाबत जनजागृती करण्याचे आवाहन**

बैठकीत एसआयआर प्रक्रियेच्या अनुषंगाने गावपातळीवर जनजागृती करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मतदार यादीतील नाव, पत्ता व इतर तपशील तपासणे, पात्र नागरिकांना नाव नोंदणीसाठी मार्गदर्शन करणे तसेच मतदार यादीतील त्रुटी नियमानुसार दुरुस्त करण्यासाठी सहकार्य करणे, यावर भर देण्यात आला.

प्रत्येक गावात आणि बूथस्तरावर कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करून नागरिकांना अधिकृत माहिती द्यावी.मतदारांना मार्गदर्शन करावे, असे आवाहन करण्यात आले.

**एकजुटीतून पक्ष संघटना मजबूत करण्यावर भर**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटना गावागावांत अधिक सक्षम करण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली. तालुका, जिल्हा परिषद क्षेत्र, पंचायत समिती गण आणि गावपातळीवर संघटनात्मक समन्वय वाढविणे, नवीन कार्यकर्त्यांना ग्रामपंचायत, जिल्हा परिषद पंचायत समिती व अनेक निवडणुकांमध्ये संधी देणे तसेच पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्य नागरिकाना कुठल्याही अडीअडचणी उद्भवल्यास जनतेच्या कामासाठी तत्पर राहावे पक्षातील वरिष्ठ नेते सर्व पक्ष कार्यकर्त्यांच्या पाठीशी आहेत प्रत्येक गावात जनसामान्याची अडीअडचण व शासकीय विभागात प्रलंबित कामांना वाचा फोडण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यकर्ते व नेते मंडळीची अग्रसर भूमिका असली पाहिजे तेव्हाच आपल्या पक्षाला बळकट करता येईल पक्षाच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेणे, यावरही चर्चा झाली.

**युवकांचे नेतृत्व आणि महिला सहभागाला प्राधान्य**

तालुक्यातील युवकांना पक्षाच्या संघटनात्मक व सामाजिक कार्यात पक्ष संघटनेला अधिकाधिक संधी, नवीन युवकांना संघटनेशी जोडणे आणि गावपातळीवर युवकांचे सहभाग मजबूत करणे, यावर विशेष भर देण्यात आला.

त्याचप्रमाणे महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा सहभाग वाढविणे, त्यांना नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि विविध सामाजिक घटकांशी संवाद वाढविणे, या विषयांवर चर्चा करण्यात आली. युवकांची ऊर्जा, महिलांचे नेतृत्व आणि अनुभवी पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन यांच्या समन्वयातून पक्ष संघटना अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

**आगामी निवडणुकांच्या तयारीवर विचारविनिमय**

आगामी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गावनिहाय कार्यकर्त्यांचा संपर्क वाढविणे, बूथस्तरावरील यंत्रणा सक्षम करणे, मतदारांशी सातत्यपूर्ण संवाद ठेवणे आणि पक्षाच्या कार्यक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे, यासंबंधी चर्चा करण्यात आली.

रक्ष्क जनजागृती, संघटनात्मक एकजूट, युवकांचे नेतृत्व आणि महिलांचा सक्रिय सहभाग या प्रमुख मुद्द्यांच्या माध्यमातून आमगाव तालुक्यात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकीला कमलबापू बहेकार, जियालालजी पंधरे, सुभाषजी यावलकर, चुनीलालजी शहारे, राजेशजी भक्तवरती, रविजी क्षीरसागर, पियुष झा, तुकाराम मेंढे, अनिल शर्मा, स्वप्निल कावडे, रमण गणेश, हर्षे डेकाटे, रवींद्रजी मेश्राम, आनंद शर्मा सेवकरामजी डोये, उदय लालजी गौतम, पुरुषोत्तम चुटे, विजय भांडारकर संचालन सुनील ब्राह्मणकर तालुका उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आभार प्रदर्शन महेंद्रजी राहगडाले युवक अध्यक्ष यांनी केला. सभेला सफल करण्याकरिता मोलाचे योगदान देणारे कार्यकरते खोमेंद्र खोब्रागडे, सुनील वाढही, अजय टेमरे मेघनाथजी कटरे भोजराज सोनवणे, भगवानदासजी बोपचे, गिरीशजी पटले, मुन्ना पटले, विनोद चुटे, सुरेश चुटे, अनिल फुंडे, उलसरामजी बहीकार, गणपतजी फुंडे, मुकेश अवसरे उमरावजी चुटे, गुड्डू भाऊ सूर्यकार, अशोक खोब्रागडे, विजय सोनवाणे, राजकुमार मेंढे, देवराव बिसेन, गणेशजी हर्षे, टेकचंदजी हरिणखेडे, विनोदजी बोरकर, विजय भांडारकर, सुभाष निहार, रघुनाथ मेश्राम, राजकुमार पटले, अजय खोब्रागडे, शंकर मुनेश्वर, सुनील शेंडे, प्रीतम कावडे, संतोष कापसे, विनोद चुटे, चैनलाल गिरीपुंजे, बाबुराव कापसे, सुनील वाढई, बाबूलाल वाढई, वृषभ शर्मा, स्वप्निल कावडे, अशोक उईके, नितेश महारवाडे, होमेंद्र खोब्रागडे, लिलेश्वर बोपचे, विकी मुनेश्वर, हंसराज गिरीपुंजे, धनराज गिरीपुंजे आणि संजय रावत यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महिला कार्यकर्त्यांमध्ये सीमाताई शेंडे, कविताताई रहांगडाले, शीलाताई ब्राह्मणकर, उषाताई हर्षे, लक्ष्मी येडे, शीलाताई पुरुषोत्तम चुटे, सविता चुटे, निलेश्वरी नरेश गौतम, रूपकला हत्तीमारे, सविता चुटे, आशिया फुंडे, मंजू चुटे, संगीता राजेश भांडारकर, वनिता गिरधारी फुंडे, मीना रामेश्वर पाथोडे, रत्नकला सुरजलाल फुंडे, नीला महेंद्रजी पाथोडे, पुष्पा अशोक खोब्रागडे, संगीता तिलकचंद खोब्रागडे, अरुणा प्रमोद चुटे, हेमलता पाथोडे, गायत्री गजानन चुटे, ललिता रामेश्वर कोरे, रितू मनोहर वाढई, अनिता दिगंबर गिरीपुंजे, शोभा राजू चुटे, माया सोनवाने माया हेमराज गिरीपुंजे, सविता देवेंद्र मेहर, सरुबाई कारुजी उके आणि मंजुश्री राजेश खोब्रागडे यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

युवकांचा उत्साह, महिलांचा सक्रिय सहभाग आणि पदाधिकाऱ्यांच्या समन्वयातून आमगाव तालुक्यात पक्ष संघटनेला अधिक बळकटी देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : गुरूवार, २२ ऑक्टोबर २०२६

थोडक्यात

## पत्रकारांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न? पत्रकार संघटनांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

### निष्पक्ष चौकशीची मागणी; कार्यवाही न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-प्रकाश टेंभरे**

साखरीटोला-सातगाव प्राथमिक आरोग्य केंद्राशी संबंधित बातम्या प्रसिद्ध केल्यानंतर पत्रकारांना धमकावणे, बदनामी करणे आणि खोट्या आरोपांद्वारे फौजदारी प्रकरणात अडकविण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप पत्रकार संघटनांनी केला आहे. या प्रकरणाची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यामार्फत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत तेलसे व काही कर्मचाऱ्यांबाबत करण्यात आलेल्या तक्रारीचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर सातगाव येथील राजू काडे यांनी पत्रकारांना धमकावल्याचा आणि त्यांना वसुलीबाज व बोगस पत्रकार संबोधून बदनामी केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच पत्रकारांनी पैशांची मागणी केल्याच्या आरोपावरून सालेकसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणातील सर्व आरोपांची स्वतंत्र चौकशी करून संबंधितांचे जबाब, कागदपत्रे आणि उपलब्ध ऑडिओ-व्हिडिओ पुरावे तपासावेत, अशी मागणी वॉइस ऑफ मीडिया, गोंदिया जिल्हा, तालुका पत्रकार संघटना सालेकसा आणि वॉइस ऑफ मीडिया, सालेकसा यांच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनावर योग्य कार्यवाही न झाल्यास पोलीस अधीक्षक कार्यालय, गोंदिया येथे बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही संघटनांनी दिला आहे. या निवेदनामुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेचा आणि पत्रकारितेच्या स्वातंत्र्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

## एलिट पब्लिक स्कूल चाचेर येथे गरबा महोत्सव उत्साहात साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

नेहमीच शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये अग्रेसर असलेल्या चाचेर येथील एलिट पब्लिक स्कूलमध्ये गरबा महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक परंपरांची जाणीव निर्माण करणे, कलागुणांना वाव देणे आणि सर्वांमध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. रक्षा बहुउद्देशीय शिक्षण संस्था, खंडाळा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या महोत्सवात विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर आकर्षक गरबा व दांडिया नृत्य सादर केले. रंगीबेरंगी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्यकलेतून उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व शाळा व्यवस्थापनाने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे महोत्सवाला विशेष रंगत आली.

या कार्यक्रमाला शाळेचे संचालक राष्ट्रपाल सी. गजभिये यांच्यासह शाळा व्यवस्थापनातील पदाधिकारी, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, कलागुणांना प्रोत्साहन मिळते आणि भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख अधिक दृढ होते, असा संदेश या महोत्सवातून देण्यात आला.

# ऊसतोडीसाठी गेलेल्या आजनी-खडुर्का येथील १० मजुरांची सुखरूप सुटका, हितेश बनसोड यांचा पुढाकार

### माजलगाव परिसरात मजुरांना डांबून ठेवल्याचा आरोप; पळून जाऊ नये म्हणून झोपडीभोवती विद्युत प्रवाह सोडल्याची धक्कादायक माहिती

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर तालुक्यातील आजनी आणि खडुर्का येथून ऊसतोडीसाठी बीड जिल्ह्यात गेलेल्या दहा मजुरांची माजलगाव परिसरातून सुखरूप सुटका करण्यात आली. ऊसतोडीच्या कामासाठी नेलेल्या मजुरांना शेतातील झोपडीत ठेवून पहाटे चार वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत काम करून घेतले जात असल्याचा आरोप आहे. तसेच मजुरांनी पळून जाऊ नये म्हणून रात्री झोपडीच्या परिसरात विद्युत प्रवाह सोडला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या प्रकरणाची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी मध्यरात्रीपासून पाठपुरावा करत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यानंतर माजलगाव येथे प्रत्यक्ष जाऊन त्यांनी दहा मजुरांना सावनेरला परत आणण्यासाठी पुढाकार घेतला.

**मजुरांना दूरच्या जिल्ह्यात नेल्याची माहिती**

मिळालेल्या माहितीनुसार, ११ ऑक्टोबर २०२६ रोजी आजनी येथील मजुरांना घेण्यासाठी टाटा एस वाहन गावात आले होते. मनसर येथील आणखी दोन मजुरांना सोबत घेऊन त्याच रात्री प्रवास सुरू करण्यात आला. मनसरपासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावर कामासाठी जायचे असल्याचे मजुरांना सांगण्यात आल्याचे समजते.



मात्र, त्यांना बीड जिल्ह्यातील माजलगाव परिसरातील तेलगाव खुर्द पोलीस ठाण्याच्या हद्दीत नेण्यात आल्याची माहिती पुढे आली.

तेथे शेतातील झोपडीत मजुरांना ठेवून वेगवेगळ्या आठ शेतांमध्ये ऊसतोडीचे काम करून घेतले जात असल्याचा आरोप आहे. पहाटे चार वाजता उठून रात्री आठ वाजेपर्यंत काम करावे लागत असल्याचेही सांगण्यात आले. मजुरांवर लक्ष ठेवले जात होते आणि त्यांनी पळून जाऊ नये म्हणून रात्री झोपडीच्या आजूबाजूला विद्युत प्रवाह सोडला जात असल्याची माहिती समोर आली आहे. या गंभीर आरोपांची संबंधित यंत्रणेकडून सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

**कुटुंबीयांची धावपळ; मध्यरात्री हितेश बनसोड यांच्याकडे मदतीची मागणी**

मजुरांनी आपल्या कुटुंबीयांशी संपर्क साधून तेथील परिस्थितीची माहिती दिल्यानंतर नातेवाइकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मदतीसाठी कुटुंबीयांनी सावनेर पोलीस ठाणे गाठले. मात्र, माजलगाव येथे जाण्याचा सल्ला देण्यात आल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. रात्री सुमारे १२ वाजता ते गावात परतले.

मदतीसाठी प्रयत्न सुरू असतानाच काही नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांच्याशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बनसोड यांनी मध्यरात्री सुमारे २.३० वाजता पीडित कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांनी सावनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी आयपीएस सागर खर्डे यांना प्रकरणाची माहिती दिली. तसेच कुटुंबीयांचे त्यांच्याशी दूरध्वनीवरून बोलणे करून दिले. आमदार डॉ. आशिष देशमुख यांनाही या घटनेची माहिती देण्यात आली.

**वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपानंतर हालचालींना वेग**

१८ ऑक्टोबर २०२६ रोजी हितेश बनसोड यांनी नागपूर ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्याशी संपर्क साधून प्रकरणाची माहिती दिली. त्यानंतर पोलीस यंत्रणेच्या हालचालींना वेग आल्याचे सांगण्यात आले.

सावनेर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक बाळू राठोड यांनीही या प्रकरणात लक्ष घातले. मजुरांना घेऊन जाणाऱ्या व्यक्तीचा शोध घेऊन त्याला



चौकशीसाठी सावनेर पोलीस ठाण्यात बोलावण्यात आल्याची माहिती आहे. चौकशीदरम्यान मनसर येथील एका महिलेचाही सहभाग असल्याची माहिती समोर आल्याचे सांगण्यात आले. संबंधित महिलेशी संपर्क साधून माजलगाव परिसरात असलेल्या मजुरांना पोलीस ठाण्यात आणण्याबाबत सांगण्यात आले.

**माजलगाव येथे पोहोचून मजुरांना आणले परत**

१८ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे नऊ वाजता सर्व दहा मजूर माजलगाव पोलीस ठाण्यात सुखरूप पोहोचल्याची माहिती हितेश बनसोड यांना मिळाली. केवळ दूरध्वनीवरील माहितीवर अवलंबून न राहता त्यांनी त्याच रात्री माजलगाव गाठले. तेथे सर्व दहा मजुरांची भेट घेतल्यानंतर त्यांना स्वतःच्या वाहनातून सावनेरच्या दिशेने परत आणण्यास सुरुवात केली.

या संपूर्ण प्रकरणात मध्यरात्रीपासून केलेला पाठपुरावा, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी साधलेला संपर्क आणि प्रत्यक्ष माजलगाव येथे जाऊन मजुरांना परत आणण्याचा घेतलेला निर्णय यामुळे हितेश बनसोड यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

संकटात सापडलेल्या मजुरांच्या मदतीसाठी हितेश बनसोड यांनी मध्यरात्रीपासून केलेला पाठपुरावा आणि प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन मजुरांना परत आणण्यासाठी घेतलेला पुढाकार महत्त्वाचा ठरला, असे राजू घुगल, उपाध्यक्ष, सावनेर नगरपरिषद यांनी यावेळी सांगितले.

१. गोलू चचाने, २. अनिल नराटे, ३. अक्षय कातकडे, ४. प्रकाश इरपाची, ५. अश्विन राऊत, ६. निकेश नेहारे, ७. निलेश इरपाची, ८. अजय कातकडे, ९. सुधीर राजुके, १०. नितीन वाघाडे अशी सुटका झालेल्या दहा मजुरांची नावे आहे.

**आणखी पाच मजूर अडकल्याची माहिती; प्रशासनाकडे चौकशीची मागणी**

दहा मजुरांची सुटका झाली असली, तरी संबंधित परिसरात आणखी पाच मजूर असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी दिली आहे. त्यापैकी एका मजुराला बोलता येत नसल्याचे, तर हे मजूर मध्य प्रदेशातील बैतूल येथील असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे उर्वरित मजुरांची ओळख पटवून त्यांची सुरक्षित सुटका करण्याची गरज व्यक्त होत आहे.

या यशस्वी सुटकेसाठी हितेश बनसोड यांनी नागपूर ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांचे विशेष आभार मानले. तसेच ऊसतोडीसाठी जिल्ह्याबाहेर जाणाऱ्या मजुरांची संबंधित पोलीस ठाण्यात नोंद असावी, त्यांची माहिती प्रशासनाकडे उपलब्ध असावी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी मागणी त्यांनी केली.

**स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर**

रोजगाराच्या शोधात जिल्ह्याबाहेर जाणाऱ्या गरीब आणि गरजू मजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे. मजुरांना सुरक्षित निवास, योग्य कामाचे तास, कुटुंबीयांशी संपर्क साधण्याचे स्वातंत्र्य आणि अडचणीच्या वेळी तातडीची मदत मिळणे आवश्यक आहे.

मजुरांना डांबून ठेवणे, त्यांच्याकडून कथितरीत्या अमानुष परिस्थितीत काम करून घेणे आणि पळून जाण्यापासून रोखण्यासाठी विद्युत प्रवाहाचा वापर करणे या आरोपांची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे. दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी आणि परिसरात अद्याप अडकले असल्याचे सांगितले जाणाऱ्या पाच मजुरांचा तातडीने शोध घेऊन त्यांची सुटका करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## नगरधन येथील झांकी स्पर्धेत चाचेरच्या मंडळांचे घवघवीत यश, छत्रपती युवा प्रतिष्ठान प्रथम, तर युवा एकता मित्र मंडळ यांच्या टीमला चतुर्थ क्रमांक

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू: मौदा**

विजयादशमी (दसरा) निमित्त नगरधन येथे आयोजित झांकी स्पर्धेत चाचेर येथील दोन मंडळांनी उल्लेखनीय यश संपादन केले. छत्रपती युवा प्रतिष्ठान, चाचेर यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर युवा एकता मित्र मंडळ आणि त्यांच्या टीमने चतुर्थ क्रमांक मिळवला. या यशामुळे चाचेर गावाच्या नावलौकिकात भर पडली आहे.

छत्रपती युवा प्रतिष्ठान, चाचेर यांच्या वतीने लेकीच्या सुरक्षेसाठी बापाची धडपड अर्थात बाप मायेचा सागर या हृदयस्पर्शी विषयावर आधारित झांकी सादर करण्यात आली.



बापाचे लेकीवरील प्रेम, तिच्या सुरक्षेसाठीची धडपड आणि समाजातील मुलींच्या सुरक्षेचा महत्त्वपूर्ण संदेश या झांकीतून प्रभावीपणे मांडण्यात आला. या उत्कृष्ट सादरीकरणासाठी प्रतिष्ठानने ४१,००० रोख प्रथम पारितोषिक आणि ५,००१ प्रोत्साहनपर बक्षीस, अशी एकूण ४६,००१ रुपयांची बक्षिसे पटकावली. या यशाबद्दल प्रो. सचिन बावनकुळे आणि छत्रपती युवा प्रतिष्ठानच्या संपूर्ण टीमचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

दरम्यान, बाजार चौक, चाचेर येथील युवा मित्र मंडळाच्या वतीने ह्यश्रीकृष्ण द्वारा शिशुपाल वधह्ल ही आकर्षक व मनमोहक झांकी सादर करण्यात आली. भगवान श्रीकृष्णांच्या पराक्रमातून अधर्मावर धर्माच्या विजयाचा संदेश देणाऱ्या या झांकीला चतुर्थ पारितोषिक प्राप्त झाले. प्रो. विशाल बरबटे आणि त्यांच्या टीमला १५,००१ रुपयांचे बक्षीस मिळाले.

दोन्ही झांकींमधून सामाजिक जाणीव, धार्मिक श्रद्धा आणि सांस्कृतिक परंपरांचे सुंदर दर्शन घडविण्यात आले. या उल्लेखनीय यशाबद्दल प्रो. सचिन बावनकुळे, प्रो. विशाल बरबटे, दोन्ही मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सर्व कलाकारांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या कलात्मक व सामाजिक उपक्रमांचे कौतुक होत आहे.

## प्रशिक्षणासाठी शिक्षकांची मनमानी निवड करणाऱ्या प्राचार्यांना लगाम लावणार का शिक्षणाधिकारी?

### शिक्षकांच्या संमतीशिवाय प्रशिक्षणासाठी नावे पाठविल्याच्या तक्रारी, शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे नियोजन करताना पारदर्शकता आणि समान संधी यांना प्राधान्य देणे अपेक्षित असताना, काही ठिकाणी प्राचार्यांकडून आपल्या मर्जीनुसार शिक्षकांची नावे प्रशिक्षणासाठी




पाठविली जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण होत असून, या प्रकाराला शिक्षणाधिकारी आळा घालणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी विविध प्रशिक्षणांचे आयोजन केले जाते. मात्र, प्रशिक्षणासाठी शिक्षकांची निवड कोणत्या निकषांवर केली जाते, एकाच शिक्षकाला वारंवार प्रशिक्षणासाठी पाठविले जाते का, तसेच सर्व शिक्षकांना समान संधी दिली जाते का, याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे. निवड प्रक्रियेत पारदर्शकता नसेल, तर शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण होणे स्वाभाविक आहे.

**प्रशिक्षणाच्या नावाखाली शिक्षकांवर अतिरिक्त ताण?**

शाळेतील अध्यापनाचे नियोजन, विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम आणि इतर प्रशासकीय कामांचा ताळमेळ साधताना शिक्षकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत प्रशिक्षणासाठी शिक्षकांची निवड करताना संबंधित शिक्षकांची परिस्थिती, प्रशिक्षणाचे स्वरूप आणि विभागीय नियमांचा विचार करणे गरजेचे आहे. केवळ काही ठरावीक शिक्षकांचीच नावे वारंवार पाठविली जात असतील, तर इतर शिक्षकांना संधी कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित होतो.

**शिक्षणाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करण्याची मागणी**

प्रशिक्षणासाठी शिक्षकांची निवड करण्याबाबत स्पष्ट निकष निश्चित करणे, निवडलेल्या शिक्षकांची यादी पारदर्शक पद्धतीने जाहीर करणे आणि तक्रारींची दखल घेणे आवश्यक आहे. प्राचार्यांना प्रशिक्षणासाठी नावे पाठविण्याचे अधिकार असले, तरी ते अधिकार नियमानुसार आणि योग्य निकषांच्या आधारे वापरले जात आहेत का, याची तपासणी होणे गरजेचे आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन प्रशिक्षण निवडीच्या प्रक्रियेची पडताळणी करावी आणि अनियमितता आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी शिक्षकांकडून केली जात आहे.

**शिक्षण विभागाला थेट सवाल!**

प्रशिक्षणासाठी शिक्षकांची निवड करण्याचे निश्चित निकष आहेत का? एकाच शिक्षकाला वारंवार प्रशिक्षणासाठी पाठविले जाते का? सर्व पात्र शिक्षकांना समान संधी दिली जाते का? शिक्षकांच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी शिक्षण विभागाकडे कोणती व्यवस्था आहे? प्रशिक्षण निवड प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी शिक्षणाधिकारी ठोस पावले उचलणार का? प्रशिक्षण हे शिक्षकांच्या गुणवत्तावाढीसाठी असते; ते निवडीतील पक्षपाताच्या तक्रारींमुळे वादाचा विषय बनू नये. त्यामुळे प्रशिक्षणाचे नियोजन नियमबद्ध, पारदर्शक आणि सर्व शिक्षकांना न्याय देणारे असणे ही काळाची गरज आहे.

## दीक्षाभूमीवर 'सेवा, ज्ञान आणि माहितीचा' त्रिवेणी संगम; महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कर्मचाऱ्यांचा स्तुत्य उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूरची पवित्र दीक्षाभूमी लाखो अनुयायांच्या श्रद्धेने आणि उत्साहाने न्हाऊन निघाली आहे. या ऐतिहासिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य विद्युत कंपन्यांतील (महावितरण, महापारेषण व महानिर्मिती) अधिकारी, अभियंते आणि कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत एक अत्यंत स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम राबवला. दीक्षाभूमीवर येणाऱ्या लाखो धम्मबांधवांसाठी अन्नदान (भोजनदान), ज्ञानदान (पुस्तक वितरण) आणि महावितरणच्या लोकाभिमुख योजनांचे विशेष माहिती केंद्र उभारून कर्मचाऱ्यांनी सेवा आणि समर्पणाचा आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे.

केवळ भोजनच नव्हे, तर नागरिकांना वैचारिक समृद्धी



आणि ज्ञानाची दिशा देण्याच्या उद्देशाने दीक्षाभूमी परिसरात भव्य पुस्तक वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित प्रसिद्ध 'वेटिंग फॉर अ व्हिसा' (व्हिझाच्या प्रतिक्षेत) आणि आचार्य सूर्यकांत भगत लिखित 'सम्राट अशोक' या पुस्तकांचे हजारो धम्मबांधवांना मोफत वितरण करण्यात आले. यासोबतच, सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा थेट फायदा मिळावा यासाठी महावितरणच्या विविध योजनांची सोप्या भाषेतील माहिती पुस्तिका, हँडबिल्स आणि पत्रके वाटण्यात आली.

या भोजनदान व पुस्तक वितरण कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन महावितरण, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या शुभहस्ते पार पडले. आपल्या उद्बोधक भाषणात बोलताना नाईक म्हणाले, "पुस्तकातील प्रत्येक पान हे केवळ कागद नसून आपल्या विचारांना दिशा देणारे शस्त्र आहे. पुस्तकातून विचारांची लाट निर्माण होते, त्या लाटेतून सामाजिक परिवर्तन घडून येते आणि त्या परिवर्तनातूनच इतिहास घडतो."

यावेळी निवृत्त मुख्य अभियंता सुहास रंगारी यांनी, "अन्नदानाने तात्पुरती तृप्ती मिळते, परंतु दीक्षाभूमीसारख्या पवित्र भूमीवरून पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानाची भूक भागवणे अधिक महत्त्वाचे आणि चिरंतन आहे," असे प्रतिपादन केले. महापारेषणचे मुख्य अभियंता सतिश अणे यांनीही तीनही वीज कंपन्यांच्या या संयुक्त उपक्रमाचे आणि कर्मचाऱ्यांच्या सेवाभावाचे मनापासून कौतुक केले.

या प्रसंगी चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता हरिष गजबे, नागपूर शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रफुल लांडे, राहुल जीवतोडे, महेश जाधव, योगेश विटनकर, डॉ. अविनाश आचार्य, मधुकर सुरवाडे, नरेंद्र तिजारे, अविनाश अंबादे, उमेश शहारे, सम्राट वाघमारे, गौतम धोंगडे, हेमराज ढोके, यांच्यासह महावितरण, महापारेषण व महानिर्मितीचे अनेक अभियंते, विविध संघटनांचे पदाधिकारी, कर्मचारी आणि निवृत्त अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महावितरणच्या माहिती दालनाला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद**

सेवाभावी उपक्रमांसोबतच महावितरणतर्फे उभारण्यात आलेल्या विशेष 'माहिती केंद्राला' देशभरातून आलेल्या धम्मबांधवांनी प्रचंड प्रतिसाद दिला. या दालनात घरगुती ग्राहकांसाठी अतिशय लाभदायक ठरणारी 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना', राज्य सरकारची 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर योजना', शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठीची 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' आणि 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' यांची सविस्तर माहिती देण्यात आली.

यासोबतच वीज वापरादरम्यान घ्यावयाची सुरक्षा आणि उपाययोजनांबाबत नागरिकांना जागरूक करण्यात आले. क्लिष्ट तांत्रिक बाबी सोप्या करून सांगण्यासाठी आकर्षक पोस्टर्स, बॅनर्स आणि ऑडिओ-व्हिज्युअल (दृकश्राव्य) माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला होता. सलग दोन दिवस या माहिती दालनात नागरिकांच्या प्रश्नांचे निरसन करण्यासाठी अभियंते आणि कर्मचाऱ्यांचे पथक अविरत सेवेत कार्यरत होते. या संपूर्ण माहिती केंद्राच्या नियोजन व संकल्पनेत मधुकर सुरवाडे, नरेंद्र तिजारे, कार्यकारी अभियंता राहुल जिवतोडे आणि उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांनी विशेष पुढाकार घेतला.

# शतक आणि शंभरी !

झाडाझडती



विनोद देशमुख
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

२०१४ पासून दिल्लीत भाजपाचं राष्ट्रीय सरकार आलं आणि सलग तिसऱ्या कारकीर्दीत सत्तेत कायम आहे, हे पाहून भाजपाच्या राजकीय विरोधकांचा तिळपापड होणं स्वाभाविक आहे. किमान चौथ्या कारकीर्दीसाठी तरी हे सरकार येऊ नये (२०२९) यासाठी त्यांनी आतापासूनच प्रयत्न करणं हेही समजू शकतं. पण त्यासाठी हिंदुत्व आणि एकूणच हिंदू समाजावर आगपाखड करण्याची त्यांची वृत्ती मात्र त्यांचा खरा चेहरा उघडा पाडणारी आहे. हिंदुद्वेष हा या सर्वांचा एककलमी कार्यक्रम असल्याचं स्वच्छ दिसत आहे. भाजपाचा विरोध करताना हिंदुत्व आणि रा. स्व. संघ यांचा उल्लेख केल्याशिवाय त्यांचं एकही पाऊल पुढे पडत नाही. याचं एक ताजं उदाहरण पाहा-

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरुद्ध काक्रोच जनता पार्टीनं देशभरात आंदोलन सुरू केलं आहे. (भाजपाविरुद्ध हे असल्यानं सर्व विरोधी पक्षांना त्यात झक्कत सहभागी व्हावं लागत आहे, हा उलटा राजकीय प्रवास !) गोव्याची राजधानी पणजी येथे २२ ऑक्टोबरला या आंदोलनांतर्गत निदर्शने झाली. तीनेकशे निदर्शकांनी फलके झळकवली, नारेबाजी केली. यातील एक घोषणा होती- "मुर्दाबाद मुर्दाबाद, हिंदुत्व मुर्दाबाद". (ही डाव्यांची स्टाईल- लाल सलाम, लाल सलाम असं दोनदा म्हणतात ते !) गोव्याच्या पोलिसांनी या घोषणेची गंभीर दखल घेत ३०० अज्ञात आंदोलकांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. धार्मिक भावना भडकवून समाजासमाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा हा हेतुपुरस्सर प्रयत्न असल्याचा आरोप या लोकांवर ठेवण्यात आला आहे. राज्यातील सामाजिक शांतता भंग करणारे असे प्रकार आम्ही खपवून घेणार नाही, या शब्दात गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आंदोलकांना ठणकावले आहे. हिंदुत्वाला ओढूनताणून आंदोलनात ओढणाऱ्या या लोकांना चांगला धडा शिकवणारी शिक्षा होते का, ते भविष्यात दिसेलच.

तमिळनाडूत तर रा. स्व. संघाला अडवण्याचे प्रयत्न सरकारी स्तरावरच सुरू आहेत. विजयादशमी उत्सवानिमित्त राज्यात सव्वाशेवर पथसंचलनं काढण्याची परवानगी संघानं रीतसर मागितली असता राज्य सरकारनं वारंवार नकार दिला. या निर्णयावरून मद्रास हायकोर्टानं राज्य सरकारला फटकारलं आणि संघाला १२८ पथसंचलनं काढू द्यावी, असा आदेश दिला. पथसंचलनं रोकण्याचा अधिकार सरकारला कोणी दिला, अशा कडक शब्दात कानउघाडणी करून न्यायालयानं सरकारला बजावलं- "स्वतःच्या जबाबदारीपासून पळ काढू नका! सुरक्षेच्या योग्य त्या उपाययोजना करा.? कारण, पथसंचलनं काढण्याचा संघ स्वयंसेवकांना अधिकार आहे आणि तो कोणीही हिरावून घेऊ शकत नाही."

बिचारं तमिळनाडू सरकार या आदेशाचं पालन करण्याच्या तयारीला लागलं. हे पाहून माकप या डाव्या पक्षानं विरोधाचा लाल झेंडा फडकवला! "राज्य सरकारनं हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याऐवजी या निर्णयाविरुद्ध सुप्रीम कोर्टात जाऊन संघाची पथसंचलनं रोकण्याचा प्रयत्न केला पाहिजे", अशी मागणी करून प्रदेश माकपनं संघाच्या मार्गात खोडा घालण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्यमंत्री जोसेफ विजय 'थलपती' यांचं सरकार यावर काय ठरवतं, हे लवकरच कळेल. कारण, पथसंचलनाच्या नियोजित तारखा आहेत २५ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर.

डाव्यांची मला नेहमीच गंमत वाटत आली आहे. संघ आणि भारतातील डावे पक्ष या दोघांचाही जन्म १९२५ चा. त्यामुळे दोघांचंही आजचं वय आहे १०१ वर्षे! या वयात संघानं जागतिक झेप घेतली आहे आणि डावे बिचारे जर्जर होऊन पडले आहेत. भारतासह संपूर्ण जगातच ते संपण्याच्या उंबरठ्यावर आहेत. केरळ राज्य कसंबसं हातात होतं, तेही गेलं आणि माजी मुख्यमंत्री पिनाराई विजयन स्वतःच भ्रष्टाचाराच्या प्रकरणात फसले आहेत. अशा अडचणीत सापडलेल्या माकपला प्रकाशात येण्याची आणि विरोधकांची सहानुभूती मिळवण्याची संधीच जणू संघाच्या पथसंचलनानं दिली. हायकोर्टाच्या निर्णयावर थलपतीला, न मागता, सल्ला देऊन माकपवाले मोकळे झाले. याच जोसेफ विजयनं त्याच्या विजयी मिरवणुकीत येशू खिस्तांचा फोटो झळकवला होता, तेव्हा ते बहुदा अ'धर्माची अफूची गोळी' घेऊन झोपी गेले होते! संघाचं नाव आलं रे आलं की आपला चिरका आवाज काढायचा आणि हिंदुद्वेषाचं प्रदर्शन करायचं, हे मात्र त्यांना चांगलं जमतं. जनतेनं संपवत आणलं तरी त्यांचं वाकडं शेपूट काही सरळ होत नाही! म्हणूनच असेल कदाचित, त्यांची शंभरी भरली. याउलट, संघानं मात्र शतक उत्साहात साजरं केलं. हा काळाचा न्याय तर नव्हे?

# रस्त्यांवरील खड्डे म्हणजे मृत्यूला निमंत्रण

लीलाधर दवंडे
कामठी (नागपूर)

राज्यात सर्वत्र बांधकामाचा धडाका सुरू असून जनतेच्या भविष्यकाळातील सुख सोयींसाठी सहापदरी आणि आठपदरी रस्ते, नवे सिमेंट रस्ते, नवे उड्डाणपूल बांधल्या जात आहे. राज्याच्या विकासाच्या दृष्टीने पक्के रस्ते महत्त्वपूर्ण ठरतात. मात्र ते सदोष नसावेत. त्यामुळे रस्त्यांचे बांधकाम होणे जितके गरजेचे असते तितकीच त्यांची देखभाल दुरुस्ती महत्त्वाची असते. नव्याने उभारण्यात आलेल्या बहुतांश रस्त्यांवर टोल नाके उभारल्याने अशा रस्त्यांच्या दुरुस्तीचा प्रश्न मिटला असला तरी शहरांतर्गत किंवा शहरापासून ग्रामीण भागांना जोडणारे रस्ते, गावखेड्यातील रस्ते मात्र या विकासाच्या धडाक्यात उपेक्षित राहिले की काय? असा प्रश्न जनसामान्यांना पडायला लागला आहे.

आताच कुठल्यातरी एका गावात रस्त्यांवर खड्डे असल्याने एसटीने आपल्या फेऱ्या बंद केल्याचे वृत्त वाचनात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो आहे. यंदा राज्यातील बहुतांश भागात दुष्काळ पडल्याचे चित्र आहे. पाऊस पडला नसला तरी राज्यातील कितीतरी रस्त्यांवर खड्डे असल्याच्या तक्रारी रोज वर्तमान पत्रांतून वाचायला मिळतात. एकतर मेट्रोचे बांधकाम आणि त्यात शहरांतर्गत रस्त्यांवर पडलेले खड्डे यामुळे अपघातांची संख्या वाढून लोकांचे जीव जात आहेत, याकडे संबंधित विभाग कधी लक्ष देईल तेच जाणे.

वाहन चालकांची सुरक्षा म्हणून दुचाकीस्वारांनी हेल्मेट घालायला पाहिजे, चारचाकी चालकांनी बेल्ट लावला पाहिजे म्हणून रस्ते परिवहन कार्यालयाचे नियम असतात. प्रसंगी दंड सुद्धा आकारला जातो. सरकारला जनतेच्या सुरक्षित प्रवासाची जर इतकीच काळजी आहे, तर मग रस्त्यांवर जागोजागी पडलेल्या खड्ड्यांची दुरुस्ती का केली जात नाही? नुसतीच डागडुजी करून पुन्हा जैसे थे सारखे गड्डे आता जीवघेणे ठरू पाहत आहे, हे नुकतेच नागपूर हुडकेश्वर परिसरातील खड्ड्यात गाडीचे चाक जाऊन मागे गाडीवर बसलेल्या भालचंद्र निलेश सडमाके यांच्या मृत्यूवरून दिसून येते.

गेल्याच महिन्यात कामठी नागपूर रस्त्यावरील टेका नाका परिसरात रस्त्यावरील खड्ड्यांमुळे ई बाईक अनियंत्रित होऊन दुभाजकावर आदळल्याने खाली पडलेल्या अंजली पांडे या तरुणीला मनपाच्या इलेक्ट्रिक बसने चिरडल्याची घटना घडली होती. त्याची शाई वाळत नाही तर हुडकेश्वर परिसरातील ही दुसरी घटना काळीज हेलावून सोडणारी आहे.

आमच्या कामठी गुमथळा रस्त्यावर आजनी गादा पर्यंतचा डांबरी रस्ता तर कित्येक ठिकाणी उखडून गेला असून जागोजागी खड्डे पडल्याने या रस्त्याने वाहने चालविणे म्हणजे तारेवरची कसरतच म्हणावी लागते. आता हा रस्ता जनप्रतिनिधींना दिसतो की नाही, कळायला मार्ग नाही.

रस्त्यांवरील खड्ड्याने भिवंडी येथील एका महिलेचा जीव घेतला असल्याची घटना अगदीच ताजी असतांना ठाणे जिल्ह्यातील गोठेघर येथे रस्त्यावरच्या खड्ड्यांनी ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान विकास गोरे यांचा जीव घेतला. रस्त्यावरील खड्ड्यात दुचाकी उसळून झालेल्या अपघातात त्यांचा मृत्यू झाला झाल्याची घटना यंदाच्या ऑगस्ट महिन्यात घडली होती. निव्वळ अपघातच नव्हे तर या खड्ड्यांनी वाहतूक कोंडीचा प्रश्न देखील उपस्थित झालेला आहे. मागच्या महिन्यात तर नाशिक शहरातील खोदलेले रस्ते आणि खड्ड्यांमुळे झालेल्या वाहतूक कोंडीने त्यात अडकलेल्या जवळपास बाराशे उमेदवारांना परीक्षा केंद्रात पोहोचण्यास उशीर झाल्याने संघ लोकसेवा आयोगाच्यावतीने आयोजित राष्ट्रीय संरक्षण सेवेच्या पेपरला मुकावे लागले. याचा दोष कुणाला द्यायचा? रस्त्यांवरील खड्डे काही जनतेने खोदलेले नाहीत आणि सरकारनेही खोदलेले नाहीत. जड वाहने आणि वाढलेले परिवहन यामुळे रस्त्यांवर खड्डे होतात, यात शंका नाही. पण, नित्कृष्ट बांधकाम सुद्धा यास कारणीभूत आहे, ही बाब नाकारता येणारी नाही. मात्र, अशा सदोष बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारांना, त्यातील मलिदा खाणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि त्यांच्यावर कृपाछत्र असणाऱ्यांना पाठीशी का घातले जाते, हेच कळत नाही.

पुणे जिल्ह्यातील सूस म्हाळुंगे मार्गावरील खड्ड्यांमुळे दुचाकी घसरून झालेल्या दुर्घटनेत एका दहा वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला होता. त्या मुलाचे मृत्यू प्रकरण ऑगस्ट महिन्यात बरेच गाजले होते. सदर मुलाच्या कुटुंबीयांना सहा लाख रुपयांची नुकसान भरपाई तत्काळ देण्यात यावी असे आदेश महापालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी आयुक्त नवल किशोर राम यांना दिले होते.

शेतकऱ्यांना आपल्या शेतातील माल सुद्धा रस्त्याने नेता येत नसल्याने भिवापूर - चिखली मार्गाची तातडीने दुरुस्ती करावी म्हणून शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी केली आहे. म्हणजे रस्त्यांवरील खड्ड्यांचे लोण आता गावखेड्यांत देखील पोहचले असल्याचे चित्र दिसून येते. वास्तविक रस्त्यांवरील खड्डे म्हणजे मृत्यूला निमंत्रण असल्याने दरवर्षी पावसाळ्यात पडणाऱ्या खड्ड्यांची तात्काळ बुजवणी होणे गरजेचे असते. याशिवाय वाहन चालकांनी सुद्धा अशा रस्त्यांवरून वाहने चालवितांना गतिमान न होता सावधगिरी बाळगायला हवी. मात्र, स्थानिक प्रशासन आणि संबंधित विभाग या खड्ड्यांच्या दुरुस्तीकडे कानाडोळा करत असतील तर खड्ड्यांमुळे अपघात होऊन मरणाऱ्यांच्या मृत्यूला संबंधित विभाग आणि स्थानिक प्रशासन कारणीभूत आहेत, असेच म्हणावे लागते.

– ८४१२८७२२०

# जाळू नकोस नुसता पुतळ्यास रावणाच्या तो आतला तुझ्याही रावण तिथे जळू दे!

काल दसऱ्याच्या निमित्ताने माझ्या पुतण्याने रावणदहनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. रावणाचा पुतळा तयार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्यापैकी काही साहित्य माज्याकडून नेले होते. त्यामुळे त्यांनी मला आवर्जून तो पुतळा पाहण्यासाठी बोलावले. मीही उत्सुकतेने तिथे गेलो. रावणाचा पुतळा पाहताच मी अक्षरशः त्याच्या प्रेमात पडलो! तो पुतळा इतका आकर्षक आणि मोहक होता की, क्षणभर मनात विचार आला. इतका सुंदर पुतळा जाळायचा तरी कशाला?

त्याच क्षणी नकळत माज्या ओठांवर शब्द आले,

जाळू नकोस नुसता पुतळ्यास रावणाच्या,
तो आतला तुझ्याही रावण तिथे जळू दे!

या दोन ओळींनी मनात विचारांचे चक्र सुरू झाले. मग मी तिथे उपस्थित असलेल्या मुलांना काही प्रश्न विचारले. रावणाचा पुतळा का जाळला जातो? तो दसऱ्याच्याच दिवशी का जाळला जातो? मुलांनी आपापल्या परीने उत्तरे दिली. रावण वाईट होता, त्याने सीतामातेला पळवून नेले होते, तो राक्षस होता, म्हणून त्याचा पुतळा जाळला जातो, असे ते म्हणाले. मी त्यांना समजावून सांगू लागलो.

"मुलांनो, आपण रावणाचा पुतळा जाळतो, पण त्यामागचा खरा संदेश काय आहे, हे समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. रावणदहन हे केवळ एका पुतळ्याचे दहन नाही, तर आपल्या मनातील वाईट विचारांचे, अहंकाराचे आणि वाईट प्रवृत्तींचे दहन करण्याचे प्रतीक आहे. आपण दरवर्षी रावणाचा पुतळा जाळतो; पण स्वतःच्या मनातील रावणाचे दहन कधी करणार? आपण खरे कधी बोलणार? दुसऱ्याला विनाकारण दुखावणे कधी थांबवणार? मनातील द्वेष, मत्सर, अहंकार आणि स्वार्थ कधी सोडणार? दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव आपल्याला कधी होणार? जोपर्यंत आपल्या वागण्यात परिवर्तन घडत नाही, तोपर्यंत केवळ पुतळा जाळून दसऱ्याचा खरा संदेश आपण आत्मसात केला, असे कसे म्हणता येईल?"

मी पुढे त्यांना सांगितले की, रावणाचे व्यक्तिमत्त्वही अनेक पैलूंनी बनलेले होते. रामायणाच्या परंपरेत रावण हा विद्वान, शिवभक्त आणि सामर्थ्यशाली राजा म्हणूनही वर्णिला जातो. मात्र, त्याच्या अहंकाराने आणि सीतेच्या अपहरणासारख्या कृतीने त्याच्या व्यक्तिमत्त्वाला कलंक लावला. यातून आपण काय शिकायचे? विद्वत्ता असूनही विवेक नसेल, सामर्थ्य असूनही संयम नसेल आणि ज्ञान असूनही सदाचार नसेल, तर त्या गुणांचे मोल कमी होते. म्हणूनच दसरा हा केवळ रावणदहनाचा उत्सव नाही; तो आपल्या अंतर्मनाचे परीक्षण करण्याचाही दिवस आहे. आपण रावणाचा पुतळा जाळतो, पण मनातील वाईट विचार जिवंत ठेवतो, तर त्या दहनाचा अर्थ काय? आपण बाहेरच्या रावणाला जाळण्यापूर्वी स्वतःमधील अहंकार, द्वेष, असत्य आणि अन्यायाच्या प्रवृत्ती ओळखायला हव्यात. त्यांच्यावर विजय मिळवायला हवा. कारण खरा विजय दुसऱ्याचा पराभव करण्यात नसतो, तर स्वतःमधील वाईट प्रवृत्तींवर मात करण्यात असतो. माझ्या मनात उमटलेल्या त्या दोन ओळी म्हणूनच केवळ काव्यपंक्ती राहिल्या नाहीत; त्या आत्मपरीक्षणाचा संदेश देऊन गेल्या.

जाळू नकोस नुसता पुतळ्यास रावणाच्या,
तो आतला तुझ्याही रावण तिथे जळू दे!

चला, यंदाच्या दसऱ्यापासून आपण एक संकल्प करूया. पुतळ्याबरोबरच मनातील वाईट प्रवृत्तींचेही दहन करूया. सत्य, प्रेम, माणुसकी आणि सदाचार यांचा स्वीकार करूया. तेव्हाच दसऱ्याचा खरा अर्थ आपल्या जीवनात उतरेल आणि विजयादशमीचा विजय आपल्या आचरणातूनही दिसून येईल!

**– विजय माणिकराव वासाडे, टेकाडी(को. ख.), मो. ८२०८५८३३०९**

# फुलांचा बहर, शेतकऱ्यांच्या पदरी कहर!

शशिकांत तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ

खरीप पीकांनी यंदा अकल्पित दगा दिला. सणासुदीच्या तोंडावर काही पैसा हातात खेळेल या हेतूने फुलशेती फुलविणाऱ्या शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आली. झेंडू फुलला शेतात, पण शेतकऱ्याच्या आयुष्यात दुःखच फुलले. दसरा-दिवाळीच्या आशेवर केलेली फुलशेती; आवक वाढल्याने खर्चही निघेनासा झाला. दसरा,दिवाळी आणि नवरात्रोत्सव म्हटले की बाजारपेठांमध्ये झेंडूच्या फुलांना मोठी मागणी असते. घरांची सजावट, देवपूजा, मंदिरांचे सुशोभीकरण आणि तोरणांसाठी झेंडूच्या फुलांना विशेष महत्त्व आहे.याच सणांच्या पर्वात दोन पैसे अधिक मिळतील आणि मागील हंगामातील नुकसान भरून निघेल, या आशेने शेतकरी झेंडूची लागवड करतो. मात्र,यंदा फुलांची आवक वाढल्याने शेतकऱ्यांच्या या आशेवर पाणी फिरले आहे.

आधीच नापिकी, पावसाची अनिश्चितता आणि दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्याला आता फुलशेतीतूनही मोठा आर्थिक फटका बसत आहे.

एका झेंडू उत्पादक शेतकऱ्याची व्यथा या परिस्थितीचे वास्तव सांगणारी आहे. पावसाने साथ दिली नाही, पिकांचे नुकसान झाले आणि घरखर्च भागवतानाच त्याची दमछाक झाली.अशा परिस्थितीत दसरा-दिवाळीच्या सणासुदीचा हंगाम डोळ्यांसमोर ठेवून त्याने झेंडूची लागवड केली. बियाणे, रोपे, खते, औषधे, पाणी आणि मजुरीसाठी पैसे खर्च केले. पिकाची काळजी घेण्यासाठी दिवस-रात्र शेतात राबला. झाडांना फुले लागली,शेत पिवळ्या-केशरी रंगांनी बहरले आणि त्याच्या मनातही चार पैसे मिळण्याची आशा फुलली.



सण जवळ आले तसे फुले तोडण्याची लगबग सुरू झाली. पहाटेपासून कुटुंबातील सदस्य फुले तोडू लागले. फुलांच्या टोपल्या भरल्या, माळा बांधल्या आणि माल बाजारात नेण्यासाठी वाहनाची व्यवस्था केली. बाजारात पोहोचल्यानंतर मात्र त्याच्या आशांना धक्का बसला. अनेक शेतकरी झेंडूच्या फुलांचा माल घेऊन आले होते. आवक वाढल्याने व्यापाऱ्यांनी कमी दर सांगितले. शेतकऱ्याने दिवसभर घाम गाळून पिकवलेल्या फुलांना अपेक्षित भाव मिळेना. खतांचे पैसे, मजुरी आणि गाडीभाडे तरी कसे भरायचे? हा प्रश्न त्याच्या मनात घोळत राहिला.माल परत घरी नेला तर फुले कोमेजणार आणि दुसऱ्या दिवशी आणखी कमी भाव मिळण्याची भीती, त्यामुळे मिळेल त्या दरात फुले विकण्याची वेळ त्याच्यावर आली. काही वेळा फुलांच्या विक्रीतून मिळालेली रक्कम वाहतूक आणि मजुरीचा खर्च भागवायलाही अपुरी पडते. उरलेल्या फुलांचे काय करायचे, हा प्रश्न वेगळाच. ज्या फुलांवर कुटुंबाच्या आशा अवलंबून होत्या, तीच फुले शेतकऱ्यांकडून केवळ दहा-वीस रुपये प्रतिकिलो रुपयांनी खरेदी करतांना व्यापारी दिसलेत. फुले बाजारात मातीमोल झाली.

या नुकसानीचा परिणाम केवळ शेतकऱ्यापुरता मर्यादित राहत नाही. मुलांच्या शिक्षणाचा खर्च, घरातील औषधोपचार, बँकेच्या कजार्चे हप्ते आणि पुढील हंगामासाठी लागणारे भांडवल या सगळ्यांवर त्याचा परिणाम होतो.दिवाळीत इतरांच्या घरात दिवे लागतात; परंतु शेतकऱ्याच्या घरात खर्चाची चिंता आणि कर्जफेडीची काळजी कायम राहते. झेंडूच्या फुलांची नाशवंत प्रकृती लक्षात घेता, केवळ उत्पादन वाढवून चालणार नाही.

बाजारपेठेतील मागणीचा अंदाज, लागवडीचे नियोजन, शीतसाठवणूक, थेट विक्री व्यवस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून सामूहिक विपणन यांची गरज आहे. बाजार समित्यांनीही शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्याचे दुःख हे केवळ कमी भावाचे नाही;तर संपूर्ण हंगामभर केलेल्या कष्टांचे मोल न मिळण्याचे आहे. दसरा-दिवाळीच्या निमित्ताने देवाच्या चरणी वाहिल्या जाणाऱ्या झेंडूच्या फुलांमागे शेतकऱ्याचा घाम,कर्ज आणि कुटुंबाच्या आशा दडलेल्या आहेत. सणांचा खरा आनंद तेव्हाच साजरा होईल, जेव्हा या फुलांना योग्य भाव मिळेल आणि फुलशेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या आयुष्यातही सुखाचे दिवस फुलतील.

थोडक्यात

## चार महिन्यापूर्वीपासून संपूर्ण रक्कम भरूनही शेतात सोलर सुरू करण्यास ऑस्ट्रेलियन प्रीमियम सोलर कंपनीची टाळाटाळ, नवरगाव येथील शेतकरी त्रस्त

### मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचा फज्जा



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहूः मौदा**

खात-रेवराल जि प क्षेत्रातील गट ग्रामपंचायत धर्मापुरी अंतर्गत येणाऱ्या नवरगाव येथील शेतकरी राजेश लक्ष्मण बावनकुळे यांची शेती मोरगाव शिवारात असून, त्या शेतात सोलर लावण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी अंतर्गत मागेल त्याला सौर कृषी पंप योजना अंतर्गत ९ जून ला संपूर्ण रक्कम ३०,६९४ (अक्षरी तीस हजार सहाशे चौऱ्यांन्नव रुपये) कंपनीच्या खात्यात ऑनलाइन जमा केले. कंपनीने नियुक्त केलेली एजन्सी ऑस्ट्रेलियन प्रीमियम सोलर (इंडिया) लिमिटेड च्या प्रतिनिधींनी बावनकुळे यांच्या शेतात सोलर लावण्यासाठी त्यांच्या घरी अर्धवट सामान आणून सोडले आहे. बावनकुळे हे एजन्सीच्या प्रतिनिधीशी भ्रमणध्वनी वरून शेतात सोलर लावण्यासाठी मागील चार महिन्यापासून वारंवार संपर्क करीत आहेत, मात्र कंपनीचे प्रतिनिधी भ्रमणध्वरीवर प्रतिसाद देत नाही, कधी दिलेच तर आपल्या शेतात सोलर आज लावून देतो ,उद्या लावून देतो असे म्हणून मागील चार महिन्यापासून सतत टाळाटाळ करीत असल्याने शेतकरी त्रस्त झालेले आहे. याबाबत सदर प्रतिनिधीने सुद्धा आज बुधवार (ता. २१ ऑक्टोबर) ला रात्री ८ः३० वाजता दरम्यान सोलर लावणाऱ्या एजन्सीच्या प्रतिनिधीच्या भ्रमणध्वनीवर दोनदा संपर्क साधला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी अंतर्गत शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येत असलेल्या मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेचा फज्जा उडालेला आहे.

## कर्करोग उपचारात आयुर्वेदाची भूमिका अधोरेखित करणारी राष्ट्रीय संगोष्ठी नागपुरात

### २३ व २४ ऑक्टोबरला श्री आयुर्वेद महाविद्यालयात आयोजन; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री आयुर्वेद महाविद्यालय व पक्वासा समन्वय रुग्णालय, हनुमान नगर, नागपूर येथे २३ व २४ ऑक्टोबर रोजी कर्करोग उपचारातील



आयुर्वेदाची उदयोन्मुख भूमिका या विषयावर द्विदिवसीय राष्ट्रीय संगोष्ठीचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय वैद्यक समन्वय समितीच्या वतीने आयोजित या संगोष्ठीचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी भारतीय वैद्यक समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेश शर्मा अध्यक्षस्थानी राहतील. तसेच डॉ. मनीषा कोठेकर, डॉ. के. के. द्विवेदी आणि डॉ. प्रज्ञा डाखोळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या संगोष्ठीत आयुर्वेदिक ऑन्कोलॉजी, शल्यतंत्र, आधुनिक कर्करोग उपचारपद्धती आणि आयुवेर्दाच्या संभाव्य योगदानावर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. व्याख्याने, संशोधन सादरीकरणे, पोस्टर प्रदर्शन आणि परिसंवादाच्या माध्यमातून कर्करोग उपचारांतील समन्वित दृष्टिकोनावर चर्चा होणार आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबत आयुवेर्दाच्या शास्त्रीय तत्त्वांचा अभ्यास करून रुग्णांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने या संगोष्ठीचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. जयकृष्ण छांगानी पत्रकार परिषदेत उपस्थित होते.

## लेखिका अनुप्रिता मोझेस पटेल यांच्या पुस्तकाचे २३ ऑक्टोबरला प्रकाशन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महिलांनी आयुष्यभर इतरांच्या अपेक्षा पूर्ण करताना स्वतःची स्वप्ने, आनंद आणि अस्तित्व यांच्याकडे दुर्लक्ष करू नये, तसेच स्वतःच्या आत्मसन्मानाला प्राधान्य देणे हा स्वार्थ नसून धैर्य, आत्मभान आणि स्वतःवर प्रेम करण्याचा अधिकार आहे, असा प्रेरणादायी संदेश लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या अनुप्रिता मोसेस पटेल यांच्या आगामी 'When She Chose Herself या पुस्तकातून देण्यात आला आहे. महिला सक्षमीकरण, आत्मसन्मान आणि स्वतःसाठी उभे राहण्याचे धैर्य या विषयांवर आधारित असलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन शुक्रवारी २३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वा. नागपुरातील सिव्हिल लाइन्स परिसरातील व्हीसीए स्टेडियमजवळ, जैका मोटर्सच्या वर असलेल्या क्रॉसवर्ड बुक स्टोअर येथे होणार आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने आयोजित पत्रकार परिषदेत पुस्तकाची संकल्पना, महिलांच्या जीवनातील संघर्ष आणि शरण फाउंडेशनच्या सामाजिक कायार्ची माहिती देण्यात येणार आहे. अनेक महिला कुटुंबाच्या आणि समाजाच्या अपेक्षा पूर्ण करताना स्वतःच्या इच्छा, स्वप्ने आणि आनंद यांना दुय्यम स्थान देतात. वषार्नुवर्षे इतरांसाठी जगल्या नंतर स्वतःच्या मनातील भावनांचा विचार करण्याची वेळ आल्यावर मी सर्वांसाठी आयुष्य जगले, पण माझे स्वतःचे काय? असा प्रश्न अनेक महिलांना पडतो. याच भावनिक वास्तवाला स्पर्श करणारे हे पुस्तक महिलांना स्वतःची किंमत ओळखण्याची, हरवलेली स्वप्ने पुन्हा शोधण्याची आणि स्वतःच्या आनंदाला महत्त्व देण्याची प्रेरणा देते.

स्वतःची निवड करणे म्हणजे इतरांना नाकारणे नव्हे, तर आपणही प्रेम, सन्मान, आनंद आणि काळजी मिळवण्यास पात्र आहोत, याची जाणीव करून घेणे होय, हा पुस्तकाचा मुख्य विचार आहे. अनुप्रिता मोझेस पटेल या लेखना सोबतच सामाजिक कार्यातही सक्रिय असून, शरण फाउंडेशनच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, शिक्षण, सामाजिक समावेशन आणि विशेषतः दिव्यांग महिला व मुलींसाठी संधी निर्माण करण्याच्या दिशेने कार्य करतात. गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यांतील विविध गावांमध्ये फाउंडेशनच्या माध्यमातून दिव्यांग महिलांशी संवाद साधण्यात आला आहे. त्यांच्या जीवनातील अडचणी, सामाजिक अडथळे, उपेक्षा आणि संघर्ष समजून घेत त्यांच्यातील क्षमता, आत्मविश्वास आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची जिद्द ओळखण्याचा प्रयत्न या उपक्रमांतून करण्यात आला.

# दहा वर्षानंतर वडिलांची भेट, कर्करोगावर मात, 'आशा'च्या आयुष्यात नव्या आशेचा किरण!

### प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूरच्या संवेदनशील प्रयत्नांना यश, शासकीय योजनेतून उपचार, कर्करोगाच्या चाचण्यांचे अहवाल निगेटिव्ह

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अनोळखी महिला मनोरुग्ण म्हणून प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथे दाखल झालेल्या आशा (नाव बदललेले) या महिलेने कर्करोगाविरुद्धची लढाई यशस्वीपणे पार केली आहे. उपचारांतील आर्थिक व प्रशासकीय अडचणी, कुटुंबीयांचा शोध आणि महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजनेकरिता आवश्यक कागदपत्र उपलब्ध नसणे अशा अनेक आव्हानांवर मात करत रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तिचे उपचार पुन्हा सुरू करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. विजयादशमीच्या पूर्वसंध्येला तिच्या कर्करोगासंदभार्तील सर्व चाचण्यांचे अहवाल निगेटिव्ह आल्याची आनंददायी बातमी मिळाल्यानंतर रुग्णालयात आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

आशा हिला १९ मार्च २०२४ रोजी शासकीय प्रियदर्शिनी महिला वसतिगृह, नागपूर यांच्यामार्फत प्रादेशिक मनोरुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दाखल होताना तिचे वय ३९ वर्षे होते. रुग्णालयात नियमित वैद्यकीय तपासणी व उपचार सुरू असताना २९ नोव्हेंबर २०२४ रोजी तिला कर्करोग असल्याचे निदान झाले. त्यानंतर तिला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे तिचे कर्करोगावरील उपचार व केमोथेरपी सुरू झाली. मात्र, जुलै २०२५ मध्ये पुढील उपचारांचा खर्च मोठा असल्याने उपचार सुरू ठेवण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. रुग्ण अनोळखी असल्यामुळे तिचे आधार कार्ड, रेशन कार्ड यांसारखी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नव्हती. तसेच तिच्या नातेवाईकांचाही शोध लागला नव्हता. त्यामुळे महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेतून पुढील उपचार सुरू करण्यासाठी अडचणी येत होत्या. जुलै २०२५ मध्ये झालेल्या MHRB बैठकीतही या विषयावर चर्चा करण्यात आली. उपचार थांबणे रुग्णाच्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य नसल्याने पुढील मार्ग शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले.

**मदतीचे आवाहन आणि कुटुंबीयांचा शोध**

तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश हुमणे यांच्या परवानगीने समाजसेवा अधीक्षक श्रीमती कुंदा काटेखाये बिडकर यांनी २ ऑगस्ट २०२५ रोजी जनतेला आशाच्या पुढील उपचारांसाठी मदतीचे आवाहन केले. मदतीला सेवा फाउंडेशन नागपूर तयार झाले मात्र, रुग्णाची वैयक्तिक गोपनीयता व प्रतिष्ठा जपणे आवश्यक असल्याने तिचे नाव आणि छायाचित्र सार्वजनिक करण्याबाबत मयार्दा होत्या, त्यामुळे ती मदत घेता आली नाही. दुसरीकडे, रुग्णाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तिच्या कुटुंबीयांचा शोध सुरूच होता. या प्रयत्नांना यश मिळावे म्हणून श्रीमती काटेखाये बिडकर यांनी रोठा, जिल्हा वर्धा येथील पोलिस पाटील श्री. नितेश बिडकर यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या माध्यमातून संबंधित गावच्या पोलिस पाटील श्रीमती बबीता घुगरे यांचा संपर्क मिळाला. त्यांच्या सहकार्याने आशाचे वडील त्याच गावचे रहिवासी असल्याची महत्त्वपूर्ण माहिती समोर आली.



२ ऑगस्ट २०२५ च्या रात्री श्रीमती बिडकर यांनी आशाच्या वडिलांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. मात्र, घरची आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती लक्षात घेता मुलीचा स्वीकार करण्यास त्यांनी सुरुवातीला असमर्थता दर्शविली. अशा परिस्थितीत श्रीमती बिडकर यांनी २ ते ६ ऑगस्ट दरम्यान सातत्याने समुपदेशन करून त्यांना मुलीला एकदा भेटण्याची विनंती केली. उपचारांसाठी आधार कार्ड व रेशन कार्ड आवश्यक असल्याचेही त्यांनी समजावून सांगितले आणि ते देण्याची त्यांना विनंती केली.

**तब्बल दहा वर्षांनंतर वडील-मुलीची भेट**

सातत्यपूर्ण समुपदेशनाला सकारात्मक प्रतिसाद देत ७ ऑगस्ट २०२५ रोजी आशाचे वडील प्रादेशिक मनोरुग्णालयात आले. तब्बल दहा वर्षांनंतर वडील आणि मुलीची भेट झाली. हा प्रसंग भावनिक आणि महत्त्वपूर्ण ठरला. कुटुंबीयांचा शोध लागल्यामुळे आशाच्या उपचारांसाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून घेण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यानंतर आशा व तिच्या वडिलांना आधार केंद्रात नेऊन आधार कार्ड अद्ययावत करण्यात आले. आयुष्मान भारत कार्ड काढण्याची प्रक्रियाही पूर्ण करण्यात आली. अखेर आशाची महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत नोंदणी करण्यात यश आले आणि तिचे कर्करोगावरील पुढील उपचार पुन्हा सुरू झाले.

कर्करोगावरील उपचार पूर्ण झाल्यावर तिला नियमानुसार वडिलांच्या स्वाधीन करण्याचे ठरले. कारण तिच्या उपचाराविषयी कोणतीही चूक किंवा दुर्लक्ष करण्याची रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांची तयारी नव्हती आणि रुग्णाच्या वडिलांची परिस्थिती पाहता त्यांनाही हे मान्य होतं.

**उपचारांसोबत मायेची ऊब आणि मानसिक आधार**

कर्करोगावरील उपचारांच्या काळात आशाला अनेकदा नैराश्याचा सामना करावा लागला. मात्र, रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, समाजसेवा अधीक्षक आणि परिचर यांनी तिला सातत्याने मानसिक आधार दिला. तिचे समुपदेशन करून मनोधैर्य वाढविण्यासोबतच औषधोपचार, विश्रांती, आहार आणि दैनंदिन सुश्रूषेकडे विशेष लक्ष देण्यात आले.

अखेर विजयादशमीच्या पूर्वसंध्येला आशाच्या कर्करोगासंदर्भातील सर्व चाचण्यांचे अहवाल निगेटिव्ह आल्याची आनंदाची बातमी मिळाली. या वृत्ताने संपूर्ण प्रादेशिक मनोरुग्णालयात आनंदाची लहर पसरली. जणू आपल्या घरातीलच एखाद्या व्यक्तीने मोठ्या संकटावर मात केली आहे, अशा भावनेने अधिकारी व कर्मचारी या आनंदात सहभागी झाले.

या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी आशाला पुष्पगुच्छ व मिठाई देऊन तिच्या नव्या आयुष्याच्या प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तिच्या दीर्घ उपचार प्रवासातील हा क्षण सर्वांसाठी समाधानाचा आणि प्रेरणेचा ठरला.

**सामूहिक प्रयत्नांतून साकारलेली यशोगाथा**

या संपूर्ण प्रवासात वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमरीश मोहबे, डॉ. पंकज बागडे, डॉ. कृणाली, डॉ. विवेक नगराळे, डॉ.आशिष कुथे, मेट्रन प्रतिभा मानकर,समाजसेवा अधीक्षक कुंदा काटेखाये बिडकर, रुग्णाच्या देखभालीत इन्चार्ज निवेदिता जॉन व मीना धुडे, मानसोपचार परिचारिका दीप्तिशिखा साळवे, परिचारिका श्रीमती अश्विनी देहारे, वंदना घुगुसकर, उज्वला वाघमारे, भाग्यश्री वाघ, प्रियंका वानखेडे, स्मृती वासनिक तसेच परिचर मनीषा नरसन्ने, श्रीमती अश्विनी फुंडे, अश्विनी दुधाते, सुशीला खंडाते, श्रीमती इंदिरा मडावी, जयश्री मेश्राम आणि मयुरी यादव यांनी रुग्णाच्या विशेष देखभाल, मानसिक बळ, योग्य सुश्रुषा ही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पोलिस पाटील नितेश बिडकर, बबीता घुगरे आणि आधार केंद्राचे मराठे यांच्या सहकार्यानेही या प्रयत्नांना दिशा मिळाली.

आशाची ही कहाणी केवळ कर्करोगावरील उपचारांच्या यशापुरती मर्यादित नाही. अनोळखी रुग्णाची ओळख शोधणे, दहा वर्षांपासून दुरावलेल्या कुटुंबापर्यंत पोहोचणे, प्रशासकीय अडचणींवर मात करणे आणि उपचारांदरम्यान माणुसकीची ऊब देणे, या सर्व बाबींचे महत्त्व या यशोगाथेतून अधोरेखित होते.

## जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनांतर्गत विविध साहित्य स्पर्धांचे आयोजन

### जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनांतर्गत विविध साहित्य स्पर्धांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्यावतीने व स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाच्या महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर यांच्या सहकार्याने येत्या, २१ व २२ नोव्हेंबर दरम्यान जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने महिला महाविद्यालयाद्वारे कथावाचन, स्वरचित कविता वाचन, निबंध लेखन तसेच संशोधन लेख प्रकाशन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. कथावाचन स्पर्धा सोमवार, २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता, तर स्वरचित कविता वाचन स्पर्धा मंगळवार, २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता महिला महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे.

कथावाचन स्पर्धेत स्पर्धकांना अलिकडील स्त्री लेखिकांनी लिहिलेल्या कथांचे वाचन करावयाचे असून स्वरचित कविता वाचन स्पर्धेत स्पर्धकांची कविता स्वतःची असणे आवश्यक आहे. या दोन्ही स्पर्धांतून निवड झालेल्या पहिल्या तीन स्पर्धकांना जिल्हास्तरीय साहित्य संमेलनात सादरीकरण करण्याची संधी मिळेल.

निबंध स्पर्धेसाठी मराठीतील स्त्रियांचे साहित्य : परंपरा आणि परिवर्तन, सुसंवादानंतर : सेतू की संकट, मी अलिकडे वाचलेली स्त्रियांची कविता, स्वातंत्र्यपूर्व काळातील महिलांचे योगदान, समाज माध्यमे : जोखीम आणि गरज, बोली साहित्यातील लेखिकांचे योगदान आणि सद्यस्थितीतील स्त्रियांचे वाचन आणि लेखन हे विषय देण्यात आले आहेत. निवडक संमेलनाच्या स्मरणिकेत प्रकाशित केले जातील. याशिवाय महिलांचे साहित्य या मुख्य विषयावर संशोधन लेख प्रकाशनाची संधीही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या स्पर्धांमधून प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि मराठी साहित्याची आवड असलेले अभ्यासक सहभागी होऊ शकतात. अधिक माहितीसाठी आयोजक प्रा. डॉ. प्रविणा नागपूरकर - ९४२३६७९९०१ आणि प्रा. डॉ. प्रांजली निमसटकर -९३७३ ९७०५४८ यांच्याशी संपर्क साधावा.

## विद्युत केंद्राच्या डोजर क्रीडा मैदानात धुळखात नादुरुस्त राम भरोसे

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

स्थानिक औष्णिक वीज केंद्रातील वाहनदुरुस्ती विभागाचा कारभार पूर्णपणे रामभरोसे सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. विभागप्रमुखांच्या कथित मनमानी कारभारामुळे आणि गलथान नियोजनामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून,वाहनांच्या देखभालीकडे होणारे दुर्लक्ष आता सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण करत आहे. प्रकाशनगर वसाहतीतील आजाद चौक क्रीडांगणाजवळ वर्षभरापासून लाखो रुपयांचा शासकीय डोझर धूळखात पडून आहे. या डोझरची दुरुस्ती करण्याकडे संबंधित विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे.



दुसरीकडे,विभागातील अनेक लहान-मोठ्या वाहनांचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून नियमित पासिंग झालेले नसतानाही ही वाहने रस्त्यावर धावत असल्याने सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे,अपघात झाल्यास जबाबदार कोण? विभागप्रमुखांना वारंवार सूचना देऊनही परिस्थितीत सुधारणा होत नसल्याचा आरोप आहे, वाहनचालकांना रात्री-अपरात्री अपघात झाल्यास रुग्णवाहिकेशिवाय जखमी कामगाराला स्ट्रेचरवरून उचलून आणायचे का,असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. वाहनांच्या देखभालीतील निष्काळजीपणा आणि सुरक्षेच्या नियमांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे कामगारांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**कंत्राटी चालकांवर आर्थिक बोजा?**

कंत्राटी कामगारांनाही या कारभाराचा फटका बसत असल्याचे चित्र आहे,काही दिवसांपूर्वी झालेल्या वाहन अपघातात वाहनाची विमा पॉलिसी नसतानाही क्लेम दाखल न करता कंत्राटदाराच्या बिलातून ३६ हजार रुपये कपात करण्यात आल्याचा आरोप आहे. याशिवाय, कंत्राटी वाहनचालकांच्या पगारातून दरमहा पाच हजार रुपये बेकायदेशीररीत्या वसूल केले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे,त्यामुळे चालकांचे आर्थिक शोषण होत असल्याची चर्चा आहे. वरिष्ठांनी चौकशी करण्याची मागणी वर्षभरापासून बंद पडलेला डोझर तातडीने दुरुस्त करावा. सर्व वाहनांचे आरटीओ पासिंग करावे. विमा नसलेली वाहने रस्त्यावर चालवू नयेत आणि विभागातील कथित अनियमिततेची वरिष्ठ पातळीवरून निष्पक्ष चौकशी करावी,अशी मागणी कामगार वर्तुळातून होत आहे. संबंधितांवर कोणती कारवाई होते, याकडे कामगारांचे लक्ष लागले आहे.

## ज्येष्ठ पत्रकार स्नेहलता श्रीवास्तव यांचे निधन

### विज्ञान आणि आरोग्य पत्रकारितेतील अग्रणी व्यक्तिमत्त्व हरपले, वयाच्या ६५व्या वर्षी अखेरचा श्वास

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहरातील ज्येष्ठ पत्रकार स्नेहलता श्रीवास्तव यांचे मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी निधन झाले. त्या ६५ वर्षांच्या होत्या.



त्यांच्या निधनाने नागपूरच्या पत्रकारिता क्षेत्रात शोककळा पसरली आहे. विज्ञान आणि आरोग्य पत्रकारितेला नवी दिशा देणाऱ्या अग्रणी पत्रकार म्हणून त्यांची ओळख होती. श्यामनगर परिसरात, अमृत लॉन्सजवळ त्यांचे वास्तव्य होते. त्यांच्या पश्चात पती सोहन श्रीवास्तव, कन्या भैरवी आणि मोठा आप्तपरिवार आहे. बुधवारी सहकारनगर येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

स्नेहलता श्रीवास्तव यांनी १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला लोकमत टाइम्समधून पत्रकारितेला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी नागपूरमधील द हितवाद, द टाइम्स ऑफ इंडिया आणि द हिंदुस्तान टाइम्स यांसह अनेक नामांकित इंग्रजी वृत्तपत्रांत काम केले. आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी विज्ञान, आरोग्य आणि कृषी या विषयांवर महत्त्वपूर्ण वृत्तांकन केले. नागपूर आणि परिसरातील विविध शासकीय, खासगी तसेच विद्यापीठांच्या संशोधन संस्थांमध्ये सुरू असलेल्या संशोधनकार्याला त्यांनी आपल्या लेखणीद्वारे व्यापक प्रसिद्धी मिळवून दिली. संशोधकांना भेडसावणाऱ्या अडचणी, वैज्ञानिक क्षेत्रातील समस्या आणि संशोधनाशी संबंधित महत्त्वाचे प्रश्न त्यांनी सातत्याने मांडले. त्यामुळे विज्ञानविषयक पत्रकारितेला शहरात वेगळी ओळख मिळण्यास मदत झाली.

कृषी क्षेत्रातील घडामोडी आणि आरोग्यसेवेतील प्रश्न हे त्यांच्या पत्रकारितेचे विशेष केंद्रबिंदू होते. डॉक्टर आणि वैज्ञानिकांशी त्यांचे जवळचे संबंध होते. या संपर्कांचा उपयोग त्यांनी केवळ माहिती मिळविण्यासाठीच नव्हे, तर सामान्य नागरिकांच्या समस्या प्रभावीपणे मांडण्यासाठीही केला. आरोग्यसेवेतील त्रुटी, नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी आणि सेवा अधिक लोकाभिमुख करण्याची गरज यावर त्यांनी निर्भीडपणे प्रकाश टाकला. स्नेहलता श्रीवास्तव यांचा स्वभाव मनमिळाऊ होता. मात्र, त्यांच्या लेखणीतून सामाजिक हिताच्या प्रश्नांवर स्पष्ट आणि परखड भूमिका मांडली जात असे. सामान्य माणसाचे जीवन अधिक सुलभ व्हावे आणि सार्वजनिक सेवांचा दर्जा सुधारावा, या उद्देशाने त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले.

त्यांच्या कायार्चा प्रभाव नागपूरमधील पत्रकारितेच्या नव्या पिढीवर पडला. विशेषतः महिला पत्रकारांसाठी त्या प्रेरणास्थान ठरल्या. विज्ञान, आरोग्य आणि कृषी यांसारख्या विषयांवर सखोल अभ्यास करून बातम्या देण्याची परंपरा त्यांनी समृद्ध केली. त्यांच्या निधनाने नागपूरच्या पत्रकारिता क्षेत्रातील एक अनुभवी, अभ्यासू आणि निर्भीड व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या कायार्चा ठसा पत्रकारिता क्षेत्रात दीर्घकाळ स्मरणात राहील.

थोडक्यात

## महाराष्ट्रातील २.५ लाख वंचित युवकांना कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराची संधी

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

महाराष्ट्रातील नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, चंद्रपूर, नाशिक आणि सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांमधील २.५ लाखांहून अधिक वंचित युवकांपर्यंत पुढील पाच वर्षांत पोहोचून त्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या प्रस्तावाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले आहे. मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या या उपक्रमामध्ये जीवन कौशल्ये, रोजगारक्षमतेचे प्रशिक्षण, उद्योजकता विकास आणि रोजगाराशी जोडणी यांचा एकात्मिक समावेश आहे. महिलांचा श्रमशक्ती सहभाग वाढविणे, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणे, ग्रामीण उद्योजकता वाढविणे तसेच पदवीधर युवकांमध्ये रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे या शासनाच्या प्राधान्यक्रमांशी हा उपक्रम सुसंगत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. या उपक्रमासाठी आवश्यक सहकार्य विभागामार्फत करण्यात येईल. तसेच निधीचे अभिसरण आणि औपचारिक सामंजस्य करार करण्यासाठीही आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' जनजागृती सत्राचे उद्या आयोजन

### विद्यार्थी, युवक, नवसंशोधक, स्टार्टअप्स व उद्योजकांनी सहभागी होण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत 'सेवा संकल्प अभियाना' अंतर्गत सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज हा उपक्रम राबविला जात असून या उपक्रमाविषयी सविस्तर माहिती व जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने उद्या (२२ रोजी) दुपारी ३:४५ ते सायंकाळी ४:४५ या वेळेत विशेष जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे सत्र वैनगंगा कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, डोंगरगाव, वर्धा रोड, नागपूर येथे आयोजित करण्यात आले असून विद्यार्थी, युवक, नवसंशोधक, स्टार्टअप्स आणि उद्योजकांनी या सत्रात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त श्रीमती नीता औघड यांनी केले आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील हे सहभागी युवकांशी संवाद साधतील.

विद्यार्थ्यांमधील नाविन्यपूर्ण विचार, सर्जनशीलता, समस्या निवारणाची क्षमता आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून यातून युवकांच्या सर्जनशीलतेला वाव मिळेल. या उपक्रमाच्या माध्यमातून कृषी, आरोग्य, संरक्षण, नगरविकास यांसह विविध क्षेत्रांतील आव्हानांवर विद्यार्थ्यांना आपल्या नाविन्यपूर्ण संकल्पना आणि उपाययोजना सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या जनजागृती सत्रामध्ये उपक्रमाची उद्दिष्टे, सहभागाच्या विविध संधी तसेच सहभाग प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली जाईल. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इनक्युबेशन केंद्रे, स्टार्टअप्स, नवसंशोधक आणि संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींनी या जनजागृती सत्रात सहभागी व्हावे,असे विभागाकडून कळविण्यात आले आहे.

## माजी विद्यार्थी संघाचे काम जिल्ह्यात प्रेरणादायी, साहित्यिक सचिन बेंडभर पाटील यांचे प्रतिपादन

**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

माजी विद्यार्थी संघ, महात्मा जोतिराव फुले विद्यालय व शंकरराव मुगुटराव कामथे कनिष्ठ महाविद्यालय शिवरी यांनी जिल्हास्तरीय



निबंध लेखन स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन करून उपक्रम शिक्षकांना व्यासपीठ निर्माण करून दिले तसेच त्यातून निवड केलेल्या २८ शिक्षकांना सन्मानित करून प्रोत्साहन दिल्याबद्दल पुणे जिल्ह्यात माजी विद्यार्थी संघाचे काम निश्चितच प्रेरणादायी आहे असे गौरवोद्गार सचिन बेंडभर पाटील यांनी सासवड येथे काढले. यावेळी कार्यक्रमाला वस्तू व सेवा कर विभागाचे उपयुक्त योगेश नेतनकर, माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, प्रकल्प संचालक संतोष हराळे, सुप्रसिद्ध वक्ते व साहित्यिक नारायण टाक, शंकरराव कामथे, बळवंत गरुड आदी मान्यवर उपस्थित होते.

पुरंदर तालुक्यातील महात्मा ज्योतिराव फुले विद्यालय व शंकरराव मुगुटराव कामथे कनिष्ठ महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघाने पुणे जिल्हास्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केले होते. यात एकूण १०६ स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यातील २८ स्पर्धकांची निवड करण्यात आली. यावेळी प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर पाटील यांनी सासवड येथील पांडुरंग भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांची कौतुक करत जिल्ह्यात त्यांची काम प्रेरणादायी असल्याचे म्हटले आहे. हा कार्यक्रम रविवार १९ ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० वाजता करण्यात आला. यावेळी चॉक अँड टॉकच्या पलीकडे या पुस्तकाचा प्रकाशन सोहळाही संपन्न झाला. पुनम साळुंखे, शुभांगी भोसले, संतोष इनामके आणि लक्ष्मण जगताप अशा उपक्रमशील शिक्षकांनी या उपक्रमात सहभाग घेतला असून या विजेत्या शिक्षकांनीही या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर यादव यांनी केले. प्रमोद धायगुडे यांनी स्वागत, अविनाश जाधव यांनी प्रास्ताविक तर तानाजी सातव यांनी आभार मानले.

## शीतल मधुकर पराते यांना आचार्य पदवी

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

किट्स इंजिनिअरिंग कॉलेज, रामटेकच्या माजी विद्यार्थिनी तथा बजाज इंजिनिअरिंग कॉलेज, वर्धा येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या



शीतल मधुकर पराते यांना व्हीआयटी, भोपाळ येथून १४ ऑक्टोबर २०२६ रोजी आचार्य पदवी प्रदान करण्यात आली. एआय फ्रेमवर्क्स फॉर सेफ्टी-क्रिटिकल अप्लिकेशन्स : रोबस्ट परसेप्शन फॉर ऑटोनॉमस व्हेईकल्स अँड एक्सप्लेनेबल सिक्युरिटी पॅच व्हॅलिडेशन या विषयावर त्यांनी शोधप्रबंध सादर केला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून स्वयंचलित वाहनांची सुरक्षितता वाढविणे आणि संगणक प्रणालींमधील सुरक्षा सुधारणांना अधिक विश्वासार्ह बनविणे, हा संशोधनाचा मुख्य विषय आहे. त्यांना डॉ. जास्मिन सेल्वकुमारी जेया यांचे मार्गदर्शन लाभले.

# विकासाला विरोध करणाऱ्या विषारी आणि अविचारी प्रवृत्ती इतिहासजमा होतील : आमदार डॉ. आशिषराव देशमुख

### माफियाराजाला थारा नाही; सावनेरची रामराज्याकडे वाटचाल, दसरा मेळाव्यात आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांचा विकासकामांवर भर, औद्योगिकीकरणातून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा निर्धार

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

विजयादशमीच्या पावन पर्वावर सावनेर नगरपरिषद मैदानावर आयोजित दसरा मेळाव्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी विकास, कायदा व सुव्यवस्था, रोजगारनिर्मिती आणि औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून सावनेर-कळमेश्वर विधानसभा क्षेत्राचा कायापालट करण्याचा निर्धार व्यक्त केला. अहंकाराचा त्याग करून दुष्प्रवृत्तींचा नाश करणे आणि लोककल्याणकारी कारभारातून रामराज्याच्या दिशेने वाटचाल करणे, हाच दसऱ्याचा खरा संदेश आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

मेळाव्याच्या प्रारंभी नगरसेवक मंदार मंगळे यांनी आमदार डॉ. देशमुख यांच्या गेल्या दोन वर्षांतील विकासकामांचा उल्लेख केला. यामध्ये १०० कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना, आठ कोटी रुपयांचे अत्याधुनिक वाचनालय, नमो उद्यान आणि इतर विकासकामांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

**माफियाराज आणि अवैध धंद्यांना थारा नाही; कायदा-सुव्यवस्थेला प्राधान्य**

उपस्थित नागरिकांना कुटुंबाचा भाग मानत आमदार डॉ. देशमुख म्हणाले की, सावनेर-कळमेश्वर परिसरात शांतता, सुरक्षितता आणि कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे ही आपली प्राथमिकता आहे. पूर्वीच्या काळात अवैध धंदे, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि तरुणांना चुकीच्या मार्गावर नेणाऱ्या प्रकारांबाबत नागरिकांना चिंता होती. अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी पोलिस यंत्रणा सक्षम करणे आवश्यक आहे.

याच उद्देशाने मोहपा येथे नवीन



पोलीस ठाणे कार्यान्वित करण्यात आले असून, खापरखेडा पोलीस ठाणे नागपूर ग्रामीण पोलिसांच्या अखत्यारीत वर्ग करण्यात आल्याचा उल्लेख त्यांनी केला. समाजात शांतता, सुरक्षितता आणि कायद्याबद्दल आदर निर्माण झाला पाहिजे. विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करणाऱ्या अविचारी प्रवृत्तींना जनहिताच्या कामांमधून उत्तर दिले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**६,४०० एकरांतील औद्योगिक विकासातून रोजगारनिर्मितीचे स्वप्न**

सावनेर तालुक्यात सुमारे ६,४०० एकर क्षेत्रावर प्रस्तावित औद्योगिक विकासाच्या माध्यमातून मध्य भारतातील महत्त्वाच्या औद्योगिक केंद्रांपैकी एक उभारण्याचे उद्दिष्ट असल्याचे आमदार डॉ. देशमुख यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल आणि परिसरातील आर्थिक व्यवहारांना चालना मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

माझ्याकडे येणाऱ्या नागरिकांपैकी मोठा वर्ग रोजगाराच्या अपेक्षेने येतो. युवकांच्या हाताला काम देणे हे माझे कर्तव्य आहे. मागील अनेक वर्षांत औद्योगिक विकासाला अपेक्षित गती मिळाली नाही; आता नव्या संधी निर्माण होत असताना त्यांना विरोध करण्याऐवजी स्थानिक नागरिकांचे हित लक्षात घेतले पाहिजे, असे ते म्हणाले.

औद्योगिकीकरणाला विरोध करणाऱ्या राजकीय भूमिका आणि विकासकामांबाबत पसरवल्या जाणाऱ्या गैरसमजांवर टीका करताना त्यांनी सांगितले की, विकासाच्या संधींबाबत नागरिकांनी वस्तुस्थिती समजून घ्यावी. जनहिताच्या कामांना अडथळे निर्माण करणाऱ्या अविचारी प्रवृत्ती काळाच्या ओघात इतिहासजमा होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा, ही भूमिका**

औद्योगिक प्रकल्पासाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भाष्य करताना आमदार डॉ. देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्याची भूमिका मांडली. त्यांच्या म्हणण्यानुसार, कोरडवाहू जमिनीसाठी प्रति एकर ३२ लाख रुपये, बागायती जमिनीसाठी ४६ ते ४८ लाख रुपये आणि फळबागांसाठी ६४ ते ६५ लाख रुपयांपर्यंत मोबदल्याची तरतूद अपेक्षित आहे. जमीन ही शेतकऱ्यांसाठी भावनिक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाची असते. त्यामुळे त्यांची वेदना समजून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये आणि त्यांना योग्य मोबदला मिळावा, यासाठी मी गरज पडल्यास आंदोलनही करेन, असे त्यांनी सांगितले.

## 'किल्ले बनवा, इतिहास जागवा' कार्यशाळा २४ ऑक्टोबरला

### खासदार शिव किल्ले स्पर्धेच्या अनुषंगाने आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती, नागपूरच्या वतीने दिवाळीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या खासदार शिव किल्ले स्पर्धेच्या अनुषंगाने शनिवार, २४ ऑक्टोबर रोजी किल्ले बनवा, इतिहास जागवा या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सीताबर्डी येथील सेवासदन शाळेच्या भानुताई गडकरी स्मृती सभागृहात दुपारी ३ वाजता ही कार्यशाळा होईल. खासदार शिव किल्ले स्पर्धा शालेय आणि खुल्या अशा दोन गटांत होणार आहे. दोन्ही गटांसाठी शिव किल्ले आणि काल्पनिक किल्ले असे दोन विषय ठेवण्यात आले आहेत. या स्पर्धेत पर्यावरणपूरक आणि पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्याचा वापर करून किल्ल्यांची निर्मिती करायची आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांना मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत किल्ला उभारण्याची पद्धत, त्याची सुरुवात कशी करावी, गड-किल्ल्यांची रचना, त्यांचे ऐतिहासिक महत्त्व तसेच किल्ल्यांची आकर्षक सजावट याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. किल्ले निर्मितीच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि गड-किल्ल्यांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

ही कार्यशाळा विनामूल्य असून लहान मुले, तरुण, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांसाठी खुली आहे. अधिकाधिक नागरिकांनी कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क : दुर्ग प्रतिष्ठान, नागपूर - ९४२२२६४५६६, ९३२५२४३४२५, ९३७३१०१२४४, ८७६७००१२७, ९८२३१२५५१५

**२ नोव्हेंबर पर्यंत करा नोंदणी**

भरघोस बक्षिसे जिंकवून देणाऱ्या या शिव किल्ले स्पर्धेत सहभागी होण्यासाठीची अंतिम तारीख लोकआग्रहास्तव पुढे ढकलण्यात आली आहे. या स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्यांना आता २ नोव्हेंबर पर्यंत नोंदणी करता येईल. नावे नोंदणीकरीता व अधिक माहितीकरिता नितीन गडकरी यांचे जनसंपर्क कार्यालय, पहिला माळा, गडकरी वाडा, महाल, नागपूर येथे १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान सकाळी १२ ते ३ या वेळेत संपर्क साधावा.



## नागरी – माढेळीत 'सेल्फी विथ खड्डा' स्पर्धा; प्रशासनाचा निषेध नोंदवण्यासाठी अनोखी शक्कल

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**

नागरी -माढेळी जिल्हा परिषद क्षेत्रातील रस्त्यांची झालेली दुर्दशा आणि रोडवरील ठिकठिकाणी पडलेल्या खड्यांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. प्रशासनाचे या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी आणि अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अभिजित कुडे यांच्या वतीने 'सेल्फी विथ खड्डा स्पर्धा' चे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत नागरिकांना माढेळी भागातील रस्त्यावरील खड्यांमध्ये उभे राहून किंवा खड्यांसोबत सेल्फी घ्यायची आहे. घेतलेली सेल्फी सोशल मीडियावर सेल्फी विथ खड्डा हा हॅशटॅग वापरून पोस्ट करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**लोकप्रतिनिधींच्या हस्ते होणार बक्षीस वितरण**

विशेष म्हणजे, या अनोख्या स्पधेर्तील विजेत्यांना बांधकाम अभियंता, आमदार आणि खासदार यांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना रस्त्यांची भीषण वास्तवता कळावी हा यामागील मुख्य उद्देश आहे. या अनोख्या उपक्रमात नागरी माढेळी जिल्हा परिषद क्षेत्रातील जास्तीत जास्त नागरिकांनी आणि तरुणांनी भाग घेऊन खड्यांसोबतचे सेल्फी पोस्ट करावेत, असे आवाहन आयोजक सामाजिक कार्यकर्ते अभिजित कुडे यांनी केले आहे.

# सोशल मीडियावरील प्रचारात वंजारी आघाडीवर

### मतदानाचे आवाहन करणारे काँग्रेस, मविआच्या नेत्यांचे व्हिडिओ व्हायरल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत काँग्रेस, महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत गोविंदराव वंजारी यांच्या प्रचाराने सोशल मीडियावर वेग घेतला आहे. मतदानाचे आवाहन करणारे काँग्रेस आणि महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांचे व्हिडिओ विविध समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असून, प्रचाराच्या अंतिम टप्प्यात डिजिटल प्रचारावर विशेष भर दिला जात आहे.

मतदारांपर्यंत थेट पोहोचण्यासाठी



सोशल मीडियाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. काँग्रेस आणि महाविकास आघाडीतील नेते, लोकप्रतिनिधी तसेच विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी व्हिडिओंच्या माध्यमातून पदवीधर मतदारांशी संवाद साधत आहेत. वंजारी यांना मतदान करून विजयी करण्याचे आवाहन या व्हिडिओंमधून केले जात आहे. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, वर्धेचे खासदार अमर काळे, आमदार सुधाकर अडबाले, माजी मंत्री राजेंद्र मुळक, माजी राज्यमंत्री रणजीत कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते व माजी मंत्री अनिल देशमुख यांनी वंजारी यांच्या समर्थनार्थ मतदानाचे आवाहन केले आहे.

याशिवाय, काँग्रेसचे नागपूर शहराध्यक्ष प्रफुल्ल गुडधे, नागपूर जिल्हाध्यक्ष अश्विन बैस, प्रदेश काँग्रेसचे महासचिव गिरीश पांडव, प्रदेश महासचिव कुंदा राऊत, गडचिरोली जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, वर्धा जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे आणि गोंदिया जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी व संस्थांच्या प्रतिनिधींनीही वंजारी यांना विजयी करण्याचे आवाहन केले आहे.

# वरोऱ्यात आझाद हिंद सेनेचा ८३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा!

### नगराध्यक्षा अर्चना ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**

जय हिंद सैनिक संस्थेच्या चंद्रपूर जिल्हा शाखेच्या वतीने वरोरा येथील शहीद योगेश डाहुले चौकात आझाद हिंद सेनेचा ८३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. वरोरा नगर परिषदेच्या नगराध्यक्षा अर्चना आशिष ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना मानवंदना देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा अर्चना ठाकरे होत्या. व्यासपीठावर माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश बोभाटे, माजी सैनिक मनोज जीवतोडे, आनंद निकेतन महाविद्यालयाचे सहयोगी एनसीसी अधिकारी लेफ्ट. डॉ. संदीप पारखी आणि जय हिंद सैनिक संस्थेचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष राजेंद्र मर्दाने उपस्थित होते.



नगराध्यक्षा अर्चना ठाकरे यांनी आपल्या मार्गदर्शनातून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जाज्वल्य देशभक्तीचा आणि संघर्षमय जीवनकार्याचा आढावा घेतला. नेताजींच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद सेनेच्या सैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःला झोकून दिले. त्यांचे शौर्य, त्याग आणि राष्ट्राप्रती असलेली निष्ठा आजच्या तरुण पिढीसाठीही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

आझाद हिंद सेनेच्या ८३ व्या स्थापना दिनानिमित्त ध्वजारोहण करण्याचा सन्मान जय हिंद सैनिक संस्थेच्या माध्यमातून मला मिळाला, हे माझे सौभाग्य आहे. हा क्षण मी कधीही विसरू शकणार नाही, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

लेफ्टनंट डॉ. संदीप पारखी यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूंगा! हा नेताजींचा नारा म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करण्याचे आवाहन होते. या आवाहनाला प्रतिसाद देत आझाद हिंद सेनेच्या सैनिकांनी स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या शौर्याची आणि बलिदानाची गाथा भारतीय इतिहासात सदैव अजरामर राहील, असे त्यांनी सांगितले. नेताजींच्या विचारांचे स्मरण करून देणारा आणि नव्या पिढीमध्ये देशभक्तीची भावना जागविणारा जय हिंद सैनिक संस्थेचा हा उपक्रम स्तुत्य असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी जय हिंद सैनिक संस्थेवर रचलेल्या कवितेचे वाचन केले.

जय हिंद सैनिक संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम सर्व भारतीयांसाठी प्रेरणादायी असल्याचे माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश बोभाटे यांनी सांगितले. देशभक्तीची भावना अधिक दृढ करण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. आझाद हिंद सेनेच्या ७५ व्या स्थापना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिल्लीतील लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करण्यात आले होते, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

प्रास्ताविकात जय हिंद सैनिक संस्थेचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष राजेंद्र मर्दाने यांनी आझाद हिंद सेनेच्या स्थापना दिनाचे ऐतिहासिक महत्त्व विशद केले.

आजचा दिवस केवळ एका ऐतिहासिक संघटनेच्या स्थापनेचा दिवस नाही, तर भारताच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या वीरांच्या शौर्याची, त्यागाची आणि देशभक्तीची आठवण करून देणारा दिवस आहे, असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी संस्थेच्या विविध मागण्या मांडल्या. टोकियो येथील रेनकोजी बौद्ध विहारात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या अस्थी असल्याचे सांगितले जाते. या अस्थींची सत्यता पडताळण्यासाठी भारत सरकारने त्या भारतात आणून डीएनए चाचणी करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच नेताजींची जयंती सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये साजरी करणे अनिवार्य करावे तसेच आझाद हिंद सेनेचा २१ ऑक्टोबर हा स्थापना दिन दरवर्षी दिल्लीतील लाल किल्ल्यावर पंतप्रधानांच्या हस्ते ध्वजारोहण करून साजरा करण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नगराध्यक्षा अर्चना ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यावर नेताजींना मानवंदना देऊन राष्ट्रगीत आणि राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी नगराध्यक्षा अर्चना ठाकरे, माजी सैनिक मनोज जीवतोडे, सुरेश बोभाटे आणि लेफ्टनंट डॉ. संदीप पारखी यांचा पुष्पगुच्छ, शाल, सन्मानचिन्ह आणि पुस्तके देऊन गौरव करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणारे माजी प्राचार्य बळवंत शेलवटकर, विजय पिसे, माजी शिक्षक लक्ष्मण पराते, शेतकरी किशोर देवडे, सामाजिक कार्यकर्ते छोटुभाई शेख, बंडू देऊळकर, राहुल देवडे, उद्योजक मधुसूदन टिपले, तुळशीदास लांजेवार आणि व्यावसायिक सतीश सारडा यांचाही सत्कार करण्यात आला.

जय हिंद सैनिक संस्थेचे राष्ट्रीय संरक्षक चंद्रमोहन बोस, राष्ट्रीय अध्यक्ष पंजाबराव मुधाने आणि राष्ट्रीय सचिव जनार्दन जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रवीण मुधोळकर यांनी केले, तर संस्थेचे तालुकाध्यक्ष प्रकाश पोहाणे यांनी आभार मानले. यावेळी जय हिंद सैनिक संस्थेचे चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्ष सागर कोहळे, पदाधिकारी विजय वैद्य, गजानन उमरे, अशोक बावणे, सामाजिक कार्यकर्ते संजू राम, तुषार मदार्ने आदींसह संस्थेचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.